## प्रकरण तिसरे

# 'समिधा' आणि इतर कादंबऱ्या

# प्रकरण तिसरे

# 'समिधा' आणि इतर कादंबऱ्या

प्रास्ताविक

१) कथानक

२) व्यक्तिचित्रण

३) भाषा

४) निवेदन

५) समारोप

-----

# प्रकरण तिसरे
# 'समिधा' आणि इतर कादंबऱ्या

## प्रास्ताविक :

स्वातंत्र्योत्तर काळात मुख्यत: १९६० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित साहित्याची चळवळ सुरू झाली. दलित लेखकांनी वेदना, विद्रोह, नकार व विज्ञाननिष्ठा या मूल्यांचा स्वीकार करून लेखन केले.

गांधीजींच्या विचारांचा प्रभाव व साम्यवादी विचार तसेच आंबेडकरांनी दलितोद्धाराच्या कार्यातून ज्या घटना घडवून आणल्या किंवा घडत गेल्या या सर्वांच्या परिणामातून मराठी कादंबरीत दलित समाजजीवन चित्रित होऊ लागले. दलित साहित्यात इतर वाङ्मय प्रकारापेक्षा 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार मर्यादित प्रमाणात हाताळल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी कादंबरीक्षेत्रात दलित समाजाचे चित्रण विविधांगी झाल्याचे दिसून येते. दलित कादंबऱ्यांचे लेखन काही दलित तसेच दलितेतर लेखकांनीही केल्याचे दिसून येते. दलित लेखकांनी जे कादंबरी लेखन केले ते अनुभूतीतून केले तर दलितेतर लेखकांनी ज्या कादंबऱ्या लिहिल्या त्या दलितांविषयी वाटणाऱ्या सहानुभूतीतून लिहिल्या. दलित समाजजीवन हे श्री.कृ. कोल्हटकर यांनी लिहिलेल्या 'श्यामसुंदर' (१९२५) या कादंबरीपासून येऊ लागले. स्वातंत्र्यपूर्व काळातील दलित कादंबऱ्यांचे प्रमाण खूपच अल्प प्रमाणात दिसून येते. परंतु हेच चित्र स्वातंत्र्योत्तर काळात बदलल्याचे दिसून येते. या कादंबऱ्यांचा विचार करताना १) दलित, २) भटक्या-विमुक्त आणि ३) आदिवासी असे तीन समाज दिसून येतात. या विभाजनामुळे अभ्यास करताना सुलभ वाटतो.

१९६० नंतरच्या काळात दलित समाजाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचे प्रमाण विपुल असल्याचे दिसून येते. त्यामध्ये दलित लेखकांमध्ये 'मुक्तिसंग्राम' (१९६९), हिं.गो. बनसोडे, 'मेलेलं पाणी' (१९८२) अशोक व्हटकर, 'कुस्ती' (१९८२) विजय सिरसट, 'जागर' (१९८२) प्रेमानंद गज्वी, 'कार्यकर्ता' (१९८४) मुरलीधर जाधव, '७२ मैल' (१९८९) अशोक व्हटकर, 'जातीला जात वैरी' (१९९०) ना.म. शिंदे, 'कृष्णपक्ष' (१९९१) पांडुरंग कदम, 'राघववेल' (१९९६) 'ऊनसावली' (१९९७) आणि 'सांजरंग' (१९९९), नामदेव कांबळे, 'मी माझ्या गावाच्या शोधात' (१९८३) शंकरराव खरात अशा बऱ्याच लेखकांचा समावेश होतो. तर दलितेतर लेखकांमध्ये 'कार्तिकी' (१९६६) र.वा. दिघे, 'बहिष्कृत' (१९७९) 'त्रिशंकू' (१९७९) अरूण साधू, 'भाकरी आणि फूल' (१९८२) मधु मंगेश कर्णिक, 'नटरंग' (१९८०) आनंद यादव, 'तणकट' (१९९८) राजन गवस अशा काही लेखकांचा समावेश होतो.

प्रस्तुत प्रकरणात रणजित देसाई यांनी लिहिलेल्या 'समिधा' (१९७९) या कादंबरीचे काही निवडक दलित तसेच दलितेतर लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने स्थान निश्चित करावयाचे आहे. रणजित देसाई यांना वाचक-समीक्षक,ऐतिहासिक कादंबरीकार म्हणून ओळखत असले तरी त्यांनी दलित जीवनावर लक्ष देऊन लेखन केले. त्यांनी 'समिधा' ही दलितांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी एक घटनाप्रधान कादंबरी लिहिली. या कादंबरीतून दलित-सवर्ण संघर्ष चित्रित केला आहे. तसेच दलित स्त्रीची सवर्णांकडून होणारी उपेक्षा लेखकाने चित्रित केली आहे.

या प्रकरणाचा अभ्यास करताना कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण व भाषाशैली या कादंबरीच्या घटकांच्या अनुषंगाने करावयाचा आहे आणि 'समिधा'चे स्थान निश्चित करावयाचे आहे.

**कथानक :**

मराठी साहित्यात कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्ये कथानकाला महत्त्व आहे. कादंबरीचे कथानक हे घटनांची साखळी असते. घटनेतूनच कादंबरीचे कथानक तयार होते. कादंबरीचे मूल्यमापन किंवा तिला मिळालेली प्रसिद्धी हे त्या कादंबरीला मिळालेल्या लौकिकतेतून दिसून येते. कादंबरी ही वाचकाला कितपत आवडली हे पाहणे गरजेचे असते. त्यामुळे कादंबरीचे कथानक वाचक मनाला उत्सुक करणारे असायला हवे. कथानक या कादंबरीच्या घटकाविषयी या लघुप्रबंधिकेतील दुसऱ्या प्रकरणात मांडले आहे. त्यामुळे इथे कथानकाविषयी सविस्तर लिहिणे गरजेचे वाटत नाही.

प्रस्तुत प्रकरणात 'समिधा' या रणजित देसाई यांनी लिहिलेल्या कादंबरीचे स्थान काही दलित तसेच दलितेतर कादंबऱ्यांच्या घटकांच्या अनुषंगाने अभ्यास करणे योग्य वाटते. प्रथम काही निवडक कादंबऱ्यांच्या कथानकाच्या अनुषंगाने विचार करू.

'हाडकी-हाडवळा' या कादंबरीतून नामदेव ढसाळ यांनी पतीच्या माघारी धाडसाने व हिंमतीने संसाराचा गाडा हाकणारी स्त्री 'बायजा' या व्यक्तिरेखेतून चित्रित केली आहे. कादंबरीचे संपूर्ण कथानक या व्यक्तिरेखेभोवती फिरताना दिसते. बायजा ही दिसायला सुंदर व लावण्यवती असल्यामुळे सवर्ण जातीतील लोकांचे तिच्याकडे लक्ष आहे. त्यांच्या मनात तिचा भोग घेण्याची इच्छा आहे. परंतु

तिच्या धाडसी व कणखर वृत्तीमुळे कुणाला हे धाडस होत नाही. तसेच बायजाला तिच्या कुटुंबाचा आणि नातेवाईकांचाही पाठिंबा असल्याने तिच्या वाटेला जाण्याचे सहसा कुणी धाडस करत नाही. बायजाच्या जीवनाचा संघर्ष हा तिचा स्थायीभाव बनल्याचे दिसून येते. 'बायजा' ही स्वभावाने स्वाभिमानी, स्पष्टवक्तेपणाने बोलणारी व प्रसंगी झुंज देणारी अशी स्त्री ढसाळ यांनी या कांदबीत चित्रित केली आहे. तिचा एवढा धाडसी स्वभाव असूनही मनबा तिच्यावर झोपेत बलात्कार करण्याचा असफल प्रयत्न करतो. तेव्हा ती सूडभावनेने पेटून त्याला ठार मारण्याचा निर्धार करते. परंतु तिच्या तावडीतून सुटून तो डोहात जाऊन जीव देतो. विष्णुपंत हा दलितांचा हाडकी हाडवळा बळकावतो. तोही फक्त दीड दमन दान्यावर. तो मल्हारी, तहसिलदार, जिल्हा महसूल अधिकार यांच्या दप्तरात खोट्या-नाट्या नोंदी करून हाडकी-हाडवळाचा मालक होतो. परंतु बायजाचा भाऊ श्रावण मास्तर याला कायदे माहित असल्याने तो विष्णुपंताविरूद्ध तक्रार नोंदवितो. परंतु विष्णुपंत हा मास्तरच्या घरी जाऊन लोकांच्या मनिऑर्डरच्या पैशातले पैसे एक दिवसाच्या वायद्यावर घेतो ते पैसे परत न करता त्याच्यावरच अपहाराची केस नोंदवतो. पोलिस जेव्हा मास्तराला पकडायला येतात तेव्हा तो आब्रूला घाबरून कन्हेराच्या मुळ्याचा रस पिऊन जीव देतो. विष्णुपंत हा पिढीजात ब्राह्मण असल्याने तो लोकांना शिव्या शाप देऊन लोकांच्या मनात भय निर्माण करण्याचे काम करतो. सावळा हरी हा दलित मुलांचा प्रतिनिधी बनून त्यांना प्रेरणा देण्याचे काम करतो. डॉ. कमलाकर गंगावणे, 'हाडकी हाडवळा' च्या कथानकाबाबत म्हणतात की, " 'हाडकी-हाडवळा'ची कथावस्तू मनोरंजक, मार्मिक, प्रभावी बनविण्यासाठी लेखकाने प्रासंगिक कथांचा विशेषत: लोककथा, गोष्टींचा उपयोग केला आहे. त्यामुळे

कथावस्तुंचा विस्तार तर झालाच त्याबरोबर वाचकाची जिज्ञासा आणि औत्सुक्यही वाढत गेलं आहे. 'हाडकी हाडवळा' एका बैठकीत वाचून काढावे असं वाचकास वाटणे स्वाभाविक आहे.''[१] डॉ. गंगावणे यांचे हे मत अगदी योग्य वाटते. कारण 'हाडकी-हाडवळा' ही कादंबरी एका बैठकीत वाचून काढण्यासारखी आहे. कारण ती वाचताना मनात निर्माण होणारी उत्सुकता आणि मुख्य म्हणजे ही कादंबरी कमी पृष्ठांची असल्याने वाचकाच्या मनाला कादंबरीचा शेवट काय असावा याची उत्सुकता वाटणे साहजिक आहे.

'७२ मैल' या कादंबरीतून निवेदक अशोक आणि राधाक्का व तिची सहा मुले यांनी सातारा ते कोल्हापूर केलेला पायी प्रवास तसेच या प्रवासात येणारे भयानक अनुभव आणि या अनुभवांना सामोरी जाणारी राधाक्का हे सर्व चित्रित झाले आहे. राधाक्का व हारण्या महार याच्या कुटुंबाची झालेली वाताहत लेखकाने कथानकातून स्पष्ट केली आहे. कादंबरीचा लेखक बालपणीच्या आठवणी या कथानकातून सांगतो. या कादंबरीच्या '७२ मैल' या पहिल्या प्रकरणात तो आपण ही कहाणी का लिहिली हे सांगतो. लेखकाचे वय सध्या अडतीस आहे म्हणजेच जेव्हा लेखकाने या कादंबरीचे लेखन केले तेव्हाचे वय. वयाच्या बारा-तेराव्या वर्षापूर्वी लेखकाने सातारा ते कोल्हापूर राधाक्का व तिच्या सहा मुलांसोबत केलेला पायी प्रवास या कादंबरीच्या कथानकातून सांगतो. म्हणजेच घटनांचे संकलन करून लेखकाने या कादंबरीची रचना केल्याचे दिसून येते. लेखकाला या आठवणी येतात तेव्हा म्हणतो की, ''पण मुळातच माझ्या अंत:करणात जर मनाला सागर म्हणायचे असेल तर निश्चितपणे एक वडवानल आहे. अंतर्मनात अचानक काहूर उठते. सगळे अंत:करण जगाविषयीच्या, दारूण अपमानास्पद अनुभवांनी पेटून उठते आणि तो

वडवानल जागा होतो. त्या बुडालेल्या आठवणींच्या तारावरचा गाळ झटक्यात दूर होतो आणि भुताटकी व्हावी तशी ती साडेतीन-तीन दिवसांची आठवण पुन्हा मनात तरंगू लागते.''[२] अशा प्रकारचे दारूण अनुभव लेखकाने या कथातून मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. कादंबरीच्या 'केवळ पाच आण्यासाठी' या दुसऱ्या प्रकरणात वडिलाने आपल्याला बोर्डिंगमध्ये का टाकले व कसे टाकले याविषयीची माहिती देतांना दिसतो. त्यातून लेखकाच्या कुटुंबाविषयी थोडीशी का होईना माहिती मिळते. बोर्डिंगातून पळून जाण्याचे लेखक का ठरवतो हे या दुसऱ्या प्रकरणात मांडले आहे. तसेच लेखक पळून आल्यानंतर राधाक्का व तिची सहा मुले यांच्यासोबत सातारा ते कोल्हापूर हा प्रवास करताना आलेली संकटे व अनुभव 'माझे पलायन', 'दुसरा दिवस' व ताटातुटीचा 'शेवटचा दिवस' या तीन प्रकरणातून चित्रण येते.

प्रवासातील या आठवणी खूपच हृदयाला भिडणाऱ्या आहेत. लेखक अशोक हा जातीने ढोर असल्यामुळे एका गाडीवानाचा मार खातो. पायी प्रवास करत असताना पोटाचाही प्रश्न त्यांच्यासमोर उभा असतो. त्यात राधाक्काला सोडले तर तिची सर्व मुले लहान असतात. ते आपल्या पोटासाठी विहिरीत सोडलेली पडळी काढून खातात. परंतु तेवढ्यावर भूक न भागल्याने राधाक्का शेवटी मुलांच्या भुकेपोटी एका हॉटेलवाल्याला ओंजळभर शेवेसाठी आपली लाख मोलाचे शरीर देते. त्या ओंजळभर शेवेवर त्यांना आपली भूक शमवावी लागते. प्रवास करत असताना राधाक्काची तीन मुले मृत्यूमुखी पडतात. परंतु एवढे भीषण दुःख राधाक्का पचवताना दिसते. लेखक अशा बऱ्याच भयानक घटना रेखाटून कादंबरीच्या आशयाला एक वेगळे वळण देण्याचा प्रयत्न करताना दिसतो.

कादंबरीचे कथानक फक्त तीन-साडेतीन दिवसांचे आहे. परंतु या कथानकातून लेखकाने जात व दारिद्रयामुळे होणारी उपासमार यामुळे माणसाला किती मोठ्या दु:खाला, प्रसंगाला सामोरे जावे लागते याचे चित्रण केले आहे. तसेच माणसाच्या पशुवृत्तीमुळे स्त्रियांच्या तसेच इतरांच्या आयुष्यात किती भयनक दु:ख निर्माण होतात याचे चित्रण प्रस्तुत कादंबरीत लेखकाने केले आहे.

'जातीला जात वैरी' या ना.अ.शिंदे यांच्या कादंबरीतील नायक हा ढोर जातीत जन्माला आलेला आहे. नायकाचे बालपण हे काही वर्षे चौदा बुलाक नामक वस्तीत गेलेले आहे. या वस्तीत ढोर, महार, मांग व चांभार यांचा समावेश होतो. यात जातिअंतर्गत असणारी श्रेष्ठ -कनिष्ठपणाची भावना, स्पृश्यास्पृश्य भेद, त्यांच्यात होणारे ताणतणाव, त्यातून निर्माण होणारा संघर्ष हे निवेदकाने स्वत: अनुभवले आहे, पाहिले आहे. अशाच प्रकारचे अनुभव निवेदकाच्या कुटुंबात तसेच त्याच्या जीवनातही येतात. ते अनुभव, आठवणी लेखक या कादंबरीत चित्रित करतो. त्या आठवणी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या तीस ते पस्तीस वर्षाच्या काळातील आहेत. या आठवणीतूनच या कादंबरीचे कथानक आकाराला येते. त्यांच्या आठवणी ह्या स्वतंत्रपणे येताना दिसतात. या आठवणींचा संबंध पुढील किंवा मागील आठवणींशी येताना दिसत नाही. त्यामुळे कादंबरीतील प्रत्येक व्यक्तिरेखा हया तेवढ्या आठवणीपुरत्याच येताना दिसतात. संपूर्ण कादंबरीत त्यांचा समावेश होताना दिसत नाही. फक्त निवेदकाचे अस्तित्व संपूर्ण कादंबरीत दिसून येते. तसेच या कादंबरीच्या कथानकाला काळाचे व वेळेचे बंधन नाही किंवा क्रमही दिसून येत नाही. लेखक आठवेल तसे सांगितल्यामुळे तो पुढे मागे जाणे होते. या आठवणी एका सूत्राभोवती गुंफलेल्या दिसून येतात. व ते सूत्र म्हणजे 'जातीला जात

वैरी' त्यामुळे कादंबरीतून चित्रित झालेले घटना, प्रसंग अवास्तव वाटत नाहीत. या कादंबरीतून इतर जातीपेक्षा ढोर जातीचे चित्रण अधिक येते. लेखकाने निवेदकाची निर्मिती ढोर जातीतील केली आहे. या जातीतील श्रेष्ठ-कनिष्ठपणाची भावना, जातिअंतर्गत निर्माण होणारा संघर्ष,अहंकाराची भावना याचे चित्रण अगदी प्रत्ययकारकपणे रेखाटण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. कादंबरीच्या कथानकातून कुठेही भडकपणा किंवा रंजकता न आल्याने कादंबरीचा आशय परिणामकारक वाटतो.

'कार्यकर्ता' कांदबरीतून मुरलीधर जाधव यांनी एका प्रामाणिक दलित कार्यकर्त्यांची आपल्या समाजासाठी कार्य करण्याची धडपड, त्याने केलेली वेगवेगळी कामे त्या कामाचे चीज न होता धुर्त व स्वार्थी नेत्यांकडून मिळणारी वाईट वागणूक या कथानकातून कार्यकर्त्याची झालेली शोकांतिका दाखवून देतात. या कादंबरीसंदर्भात सुशिला ढगे म्हणतात, ''स्वतःच्या समाजातील दोष स्वतःच्याच लेखनीतून साकार करणे ही गोष्ट कीती कठिण परंतु सत्तेचे राजकारण खेळणारे नेते आणि त्यांच्याय हुकुमशाहीने पिचून जाणारे कार्यकर्ते यांची ओळख करून देताना कार्यकर्त्यांच्या व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनातील हालअपेष्टेने बेचैन झालेला हा लेखक व्याकुळ अंतःकरणाचे जीवन चित्रित करतो.''[३]

कादंबरीचा नायक सदा याच्या जीवनात घडलेल्या घटना प्रसंगाचे हे क्रमवार संकलन असल्याचे जाणवते. कादंबरीतील दलित तरूण पांडू याला धामीण जातीचा सर्प चावतो परंतु तो दलित असल्याने गावकरी त्याला भैरवनाथाच्या देवळात घेत नाहीत. त्यामुळे तो मरतो. तेव्हा त्याचा भाऊ त्याच्या आईच्या गळ्याला पडून रडतो. यातून लेखकाने अस्पृश्यता व अंधश्रध्दा याचे चित्रण केले आहे. तसेच

सापाची जात ही विषारी नसूनही पांडू मरतो हे लेखकाने अवास्तव बटबटीत चित्रण केले आहे. सवर्णांकडून दलितांवर होणारा अन्याय - अत्याचार इथे दिसून येतो.

'मी माझ्या गावाच्या शोधात' या कादंबरीतून शंकरराव खरात यांनी बहिष्कार टाकलेल्या आपल्या दलित समाजाच्या शोधार्थ नायकाचे दर्शन घडविले आहे. कादंबरीचा नायक आनंदा हा जेव्हा बी.ई. सिव्हीलची पदवी घेऊन आपल्या गावी येतो तेव्हा समजते की गावातील सवर्ण लोकांनी आपल्या समाजावर बहिष्कार टाकला आहे. त्यामुळे आपले कुटुंब, आपला समाज वाट फुटेल त्या दिशेने पळत सुटला आहे. म्हणून आनंदा आहे त्याच पावलाने आपल्या कुटूंबाच्या व समाजाच्या शोधार्थ बाहेर पडतो. सवर्णाच्या या अन्यायाने तो पेटून उठतो. केवळ सवर्णाच्या अन्याय-अत्याचारामुळे आपल्या समाजाला घरदार, गाव सोडावे लागले हे त्याला सहन होत नाही. तेव्हा लेखक आपल्या आई-वडिलांच्या व आपल्या समाजाच्या शोधार्थ निघतो.

गावाचा शोध घेत असताना वाटेत जिथे जिथे दलितांच्यावर अन्याय होताना दिसेल तिथे तो बंड पुकारतो व संघर्ष करण्यास प्रवृत्त होतो. माणसा-माणसात भेदभाव करणारी गावकुसाची तटाची भिंत पाडतो, सोनाबाय नावाच्या दलित स्त्रीची आब्रू वाचवतो आणि तिच्यावर अत्याचार करणाऱ्याला ठार मारतो. तेव्हा आनंदावर खटला सुरू होतो. परंतु न घाबरता तो कोर्टात सर्व गुन्हे कबूल करतो परंतु ते गुन्हे नसून माणसाला जे स्वातंत्र्य दिले आहे त्या स्वातंत्र्यासाठी असे वागलो. कारण सवर्णांनी सर्व दलितांचे स्वातंत्र्य हिसकावून घेऊन त्यांना गुलामीचे जगणे दिले आहे परंतु या गुलामीची जाणीव आपल्या समाजातील लोकांना नसल्याचे तो सांगतो. तसेच एका दलित अबला स्त्रीवर अत्याचार होताना तो तिला आपली

बहिण समजून वाचवतो या सर्व गोष्टींचा सोक्षमोक्ष कोर्टात लागतो आणि आनंदाची निर्दोष मुक्तता करण्यात येते. या कोर्टातच त्याचे आई-बाप आणि समाजही त्याला दिसतो म्हणजेच शेवटी त्याचा त्याला गाव सापडतो.

खरात यांनी या कथानकातून एका स्वातंत्र्योत्तर दलित तरूणाची आपल्या समाजासाठी, समाजजागृतीसाठी चाललेली धडपड व्यक्त केली आहे. परंतु या कादंबरीतून एक गोष्ट सिध्द होते ती म्हणजे दलितांनी स्वातंत्र्य मागून मिळत नाही तर ते सवर्णांकडून, उच्चवर्णीयांकडून हिसकावून घ्यावे लागते आणि तेच धाडस या कादंबरीतील नायकाने केले आहे. खरात यांनी स्वातंत्र्योत्तर दलित तरूण पिढीचे चित्रण आनंदा या व्यक्तिरेखेतून केले आहे.

'कुस्ती' कादंबरीत विजय सिरसट यांनी एका सुशिक्षित दलित तरूण युवकाची बेकारी आणि त्यामुळे त्याची चाललेली, जीवनाशी कुस्ती चित्रित केली आहे. तसेच एकीकडे उच्चवर्णीय समाजातील मुलींबरोबर प्रेम आणि दुसरीकडे बेआब्रू झालेली त्याची मामे बहिण या दोघींच्यामध्ये अडकलेला प्रकाश. परंतु प्रकाश प्रेमाला लाथाडून बेआब्रू झालेल्या रमाशी लग्न करण्याचा निर्णय घेतो तेव्हा तो या कुस्तीत हारलो असे समजतो परंतु त्याच्या या निर्णयातून तो सामाजिक बांधिलकी जपताना दिसून येतो.

'कुस्ती' कादंबरीचा नायक प्रकाश गायकवाड हा सुशिक्षित आहे पण तो बेकार आहे. तो चळवळीत नेहमी सहभागी आहे. परंतु चळवळीमध्ये होणारे राजकारण, त्याच्या प्रेमविषयक भावना, सामाजिक बांधिलकी, त्याचे वैयक्तिक व सामाजिक विचार यामध्ये होणारी घुसमट, दारिद्र्यामुळे त्याची होणारी दुरावस्था याचे चित्रण या कादंबरीतून होते. प्रकाश हा मूळचा चांदणी गावचा रहिवाशी आहे.

परंतु शिक्षण व नोकरी या निमित्ताने तो बीड शहरात राहतो. तो सुशिक्षित असल्याने समाजासाठी संघटनेत काम करतो. त्याची संपादक होण्याची जबर इच्छा असल्याने संपा डमढेरे यांच्याकडे पत्रकारितेच काम करतो परंतु तो त्याला पगार देत नाही. म्हणून ज्या कॉलेजात शिकतो त्याच कॉलेजामध्ये क्लार्कची नोकरी करतो. प्रकाशचे मिनाक्षी नावाच्या ब्राह्मण मुलीवर खूप प्रेम आहे. परंतु तो प्रेमाइतकेच आई-वडील व आपल्या समाजाला बरोबरीचे स्थान देताना दिसतो.

प्रकाश हा चांदणी या खेड्यातील अस्पृश्य कुटूंबात जन्मलेला सुशिक्षित दलित तरूण आहे. चांदणी गावचा सावकार कचरू पाटील याचा मुलगा शिवा व प्रकाश यांची लहापणापासूनची मैत्री आहे. त्यांची ही मैत्री जातियतेला फाटा देते व माणुसकीचे चित्रण घडविते. प्रकाशचे आई-वडील व रमा ही मंडळी शिवाच्या मळ्यात मजुरी करतात. नारायण हा सुभानराव सरपंचाचा मुलगा आहे तर वसंता हा नारायणचा मामा आहे. हे दोघेही गुंडप्रवृत्तीची आहेत. त्या दोघांचे रमाकडे जास्त लक्ष आहे. त्यांना तिचा भोग घेण्याची इच्छा आहे. त्यासाठी ते शिवाचा वापर करण्याचा प्रयत्न करतात. परंतु रमाच्या ही गोष्ट लक्षात येताच ती शिवाला राखी बांधते. तेव्हा चिडून नारायण व वसंत बुधेगावच्या दरोडेखोरांकरनी शिवाचा खून करतात. प्रकाश शहरात असल्याने रमाच्या घरी तिला पाठिंबा देणारे कोणी नाही ओळखून याच संधीचा ते दोघे फायदा घेतात आणि एके रात्री तिच्या घरी जाऊन तिच्या आई-वडीलांना बेदम मारतात आणि रमाला उचलून आणून मांजरा नदीच्या वाळूत तिच्यावर बलात्कार करतात. परंतु रमा ही गोष्ट फक्त प्रकाशला सांगते आणि पोलिसांपासून लपवते. तेव्हा प्रकाश आपले प्रेम विसरून रमाला स्वीकारण्याचा निर्णय घेतो. तसेच प्रकाश हा 'दलित युवक मोर्चा'चा सचिव

असल्याने चळवळीच्या मोर्च्याच्यावेळी महापचा विरोध पत्करूनही मांग लोकांचासमावेश आपल्या मोर्च्यात करतो म्हणून चळवळीतील दलित संघ त्याला वेगळा प्रकाश हा रमाच्या बाबतीत बोलका सुधारक होण्यापेक्षा तो रमाबरोबर लग्न करण्याचा निर्णय घेतो. तेव्हा चळवळीतील लोकांना तो राजकीय स्टंट वाटत असला तरी मिनाक्षी बरोबरचे त्याचे नाते तोडताना त्याला मिनाक्षीचे आरोप सहन करावे लागतात. लेखकाने 'कुस्ती' मधून एका दलित तरूणाच्या प्रगतीत येणारे अडथळे चित्रित केले आहेत. या कथानकावरून असे जाणवते की ही कादंबरी भावनेपेक्षा विचाराला आव्हान करणारी कादंबरी आहे. तसेच या कादंबरीतून दलित समाजाच्या भयान दारिद्रयाचे चित्रण होते.

'बहिष्कृत' या कादंबरीतून अरूण साधू यांनी स्वातंत्र्योत्तर दलित तरूण अशोक यांच्या वाट्याला जे कडू-गोड अनुभव येतात. त्याचे वास्तव चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीचा नायक अशोक सोकाजी इंगळे हा रिदगाव या गावी नोकरीवर रूजू होतो. रिदगावातील कुलकर्णी मास्तर यांच्याकडे तो राहतो. परंतु त्याचे आपल्या समाजातील लोकांच्याकडे बारीक लक्ष आहे. गावातील दलितांना एक विहिर आहे परंतु त्या विहिरीचे पाणी खूप घाण असते. त्यात पावसाळा असल्याने विहिरीचे पाणी खूपच घाण होते. दलितांना पिण्याच्या पाण्यासाठी सवर्णानी आपली विहिरी मोकळी करून दयावी असे त्याला वाटते त्यासाठी तो दलित समाजातील काही तरूणांना एकत्र करून सत्याग्रह करतो. परंतु सवर्ण लोक हे रघोजी देशमुखाच्या आज्ञेनुसार त्यांच्यावर हल्ला करतात. त्यामध्ये देवराज रूपा आणि अशोक ह्या तिघांचा बळी जातो. सर्व दलित वस्ती सवर्णांकडून

उद्ध्वस्थ केली जाते. परंतु तहसिलदारच्या आदेशावरून सवर्णांची विहिर दलितांना मोकळी केली जाते.

या कादंबरीच्या कथानकाविषयी प्रा. दत्ता भगत म्हणतात की, ''अशोक सोकाजी इंगळे रिदगावात शिक्षक म्हणून येतो आणि पाणवठ्याच्या प्रश्नावर हुतात्मा होतो. हे सगळं घडतं अवघ्या चार ते पाच दिवसात यातील बारीक सारीक घटना कथानकाला अशोकच्या होंतात्म्याकडे वेगाने नेतात. कथानकाची ही गतिमानता रचना तंत्र हया नात्याने कादंबरीचे महत्वाचे वैशिष्टये ठरते.''[३] तसेच अशोकला रिदगावात येऊन फक्त ३-४ दिवस झालेले आहेत. तरीही तेथील दलित हे पाण्याच्या प्रश्नावर अशोकच्या बाजूने लढण्यास संघटित कसे काय होतात. आतापर्यंत पाण्याचा त्रास त्यांना नव्हता तर तेच घाण पाणी रिदगावातील दलित तरूण पीत होते. या घटनेवरून लेखकाने काही तात्कालिक घटनांचा वापर करून कथानकाची उंची वाढवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

'तणकट' या कादंबरीतून राजन गवस यांनी दलितांमधील स्वातंत्र्योत्तर तरूण पिढीमध्ये असलेले दोष दाखवून दिले आहेत. या कादंबरीतील दलित चळवळीत काम करणारी नेते मंडळी चळवळीचा उपयोग स्वत:च्या स्वार्थासाठी करून घेतात. सवर्णांकडून दलितांवर होणाऱ्या अन्यायाची चाहूल लागताच ही नेतेमंडळी आक्रमक बनतात त्यामुळे गावातील तरूण मुले बिघडतात. ही मुले शिक्षणाकडे दुर्लक्ष करून आपला पूर्ण वेळ सवर्णांशी संघर्ष करण्यात घालवतात. चळवळीतील लोकांच्या पाठिंब्यामुळे ही दलित तरूण मुले सवर्णाविरूध्द खोट्या तक्रारी पोलिस स्टेशनमध्ये नोंदवतात. याचा परिणाम सामोपचाराने व गोडी-गुलाबीने नांदणाऱ्या दलित-सवर्ण संबंधावर कसा होतो हे कादंबरीचे मुख्य कथानक आहे.

'भाकरी आणि फूल' या कादंबरीतून मधु मंगेश कर्णिक यांनी तीन पिढ्यांचे चित्रण केले आहे. कर्णिक हे या कादंबरीच्या कथानकातून स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचा पंचवीस वर्षाच्या काळातील दलित समाजाच्या स्थित्यंतराचा आलेख रेखाटताना दिसतात. तसेच काळानुसार घडणाऱ्या घटनांचा वापर अचूकपणे करून कथानकाची निर्मिती करताना दिसतात. कादंबरीचे कथानक कोकणातील 'करूळ' नावाचे लहानसे गाव आणि मुंबई अशा दोन ठिकाणी घडते. कादंबरीचे कथानक 'शिवनाक महार' या दलित व्यक्तींच्या कुटूंबाभोवती फिरते. लेखक या कुटूंबाच्या अनुषंगाने नव्या आणि जुन्या दलित पिढीचे, त्यांच्या आचार विचारांचे, राहणीमानाचे चित्रण अगदी लक्षणीय वाटण्याजोगे करताना दिसतो. कादंबरीतील उपकथानके खूपच महत्वाची आहेत. कारण लेखकाने शिवनाक या दलित व्यक्तीच्या कुटूंबातील पंचवीस वर्षाचा कौंटुबिक अनुभव चित्रित केला आहे.

शिवनाक महार व त्याची पत्नी धुर्पती यांना पांडू, गोंद्या, पुतळी, गोपाळ आणि आनंद अशी पाच अपत्य आहेत. पांडू हा अशिक्षित असल्याने तो वडिलांच्या विचाराशी सहमत आहे. तसा गोंद्या थोडाफार शिकला आहे परंतु तोही अर्धवट शिक्षण सोडतो मात्र गोपाळ हा दहावी पास होतो आणि संघटना व चळवळीत भाग घेतो. आनंदा हा देखील गोपाळकडे जाऊन शिक्षण घेतो व नोकरी करतो. गोपाळ हा चळवळीत असल्याने तो आंबेडकरी विचाराने भारावून गेलेला आहे. त्याकरिता तो आपल्या घरीही आपल्या मनाप्रमाणेच वागावे यासाठी प्रयत्न करतो. मेलेल्या बैलाचं मांस खाण्यासाठी तो वडिलांना व आईला विरोध करतो तो गावातील सवर्णांचा विरोध पत्करून रामेश्वराच्या मंदिरात प्रवेश करतो. गडेमठच्या बहिणीची वेणूची गावकरी विटंबना करतात. कारण ती येणे असलेली मजुरी खोताकडे मागते.

गावचा एक माणूस वेणूवर बलात्कार करतो परंतु गोपाळ हा चळवळीचा कार्यकर्ता असूनही तो आपल्या बहिणीबद्दल काही करू शकत नाही. गोपाळ हा विवाहित आहे. तोही नोकरी करणाऱ्या मुलीशीच लग्न करतो. परंतु गोपाळचा बाप हा परंपरेने चालत आलेली बलुतेदारीची कामे आपल कर्तव्य समजून करताना दिसतो. करूळ मधील सवर्ण व दलित यांचे संबंध सलोख्याचे असतात. करूळमधील जवळजवळ सर्वच दलित हे परंपरेने चालत आलेल्या रूढी पाळताना दिसतात. गोपाळ व आनंदा यांना बापाचे हे वागणे खटकत असते.

'करूळ' गावातील दलितांचा व्यवसाय, गावातील मंदिर प्रवेश, धर्मांतर शिवनाकच्या गडेमठ येथे दिलेल्या मुलीवर झालेला अत्याचार यासंबंधीचा आलेला कथाभाग, कादंबरीतील आशय परिणामकारक बनवितो. कादंबरीत आलेले घटना-प्रसंग वास्तवाशी इमान राखताना दिसतात.

'समिधा' या कादंबरीतून रणजित देसाई यांनी 'रानगाव' या खेड्यातील दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण केले आहे. तसेच स्वातंत्र्योत्तर दलित तरूण पिढी व स्वातंत्र्यपूर्व दलित पिढी याचेही चित्रण केले आहे. 'समिधा' ही कादंबरी रानगावातील देवा महार याच्या कुटूंबावर तसेच तेथील दलितांच्या जीवनावर आधारीत आहे.

तुका हा देवाचा कर्तृत्व संपन्न मुलगा तर मुक्ता ही देवाची एकुलती एक हुशार, महत्त्वकांक्षी, जिद्दी मुलगी आहे. तुका हा मुंबईला चुलत्याकडे राहून आक्रमक व आंबेडकरी विचाराने प्रभावित झालेला दिसून येतो. देवा हा पारंपरिक विचाराचा, जुन्या वळणाचा सवर्णांची पडेल ती कामे आपले कर्तव्य समजून करणारा आहे. परंतु तुका नव्या वळणाचा सवर्णांच्या दादागिरीला भीक न घालता समाजात

मानाने जगणारा आहे. त्यामुळे सवर्ण व दलित यांच्यात संघर्ष निर्माण होतो. रानगावचा सरपंच भगवंतराव देशमुख व त्याची चांडाळचौकडी मिळून तुकाला व त्याच्या समाजाला त्रास देतात. तुका आपल्या समाजातील लोकांनी सवर्णांची घाणेरडी कामे करू नये त्यांनी समाजात माणसासारखे जगावे याकरिता प्रयत्न करतो. तो समाजात सरकारच्या सवलतीचा फायदा करून घेतो आणि समाजासाठी तक्क्या बांधतो, रस्ते करतो, लोकांसाठी रोजगार उपलब्ध करून देतो, तसेच सिमेंटमध्ये घरे बांधून देतो. परंतु सवर्ण त्याला वेळावेळी विरोध करताना दिसतात.

तुकाची बहिण मुक्ता ही दहावी पास होऊन नर्सची नोकरी करते. आपण नेहमी शिकावे, स्वच्छ रहावे आणि माणसासारखे जगावे असे तिला वाटत असते. परंतु रानगावचा सरपंच भगवंतराव याची नजर नेहमी मुक्तावर असते. मुक्ता त्याच्या हाती सहजासहजी लागत नाही हे समजताच ते तिच्या दीड वर्षात चार ठिकाणी बदल्या घडवून आणतात. शेवटी भगवंतराव व त्याची चांडाळ चौकडी तिच्यावर बलात्कार करण्यात यशस्वी होतात. तुकाच्या या वागण्याला देवाचा नेहमी विरोध असतो तुकाने सवर्णांशी वैर पत्करू नये असे वाटत असते. आंबेडकर जयंतीच्यावेळी गांधीच्या पुतळ्याचा हात तुटल्याच्या कारणावरून हरिजनवाडा जाळतात. त्यामध्ये देवा व शेवंताचा बाप प्राण गमावून बसतात.

अशा प्रकारे लेखकाने ‘समिधा’ मधून एका दलित तरूणाच्या जीवनाची शोकांतिका व्यक्त केली आहे. तसेच मुक्ताच्या माध्यमातून एका सुशिक्षित दलित स्त्रीची दुर्दशा व्यक्त केली आहे.

कृष्णपक्ष कादंबरीचे कथानक बौद्ध धर्म स्वीकारलेल्या पूर्वाश्रमीच्या दलित तरूणाची शोकाकून आयुष्याची कथा आहे. पारंपरिक पद्धतीच्या रचनातंत्राला डावलून पांडूरंग कदम यांनी हे कथानक रचले आहे असे दिसून येते.

'अजून उजाडायचं आहे' या कादंबरीतून माधव कोंडविलकर यांनी गावकीच्या कामात रात्रंदिवस राबणाऱ्या देवजी चांभाराच्या दु:खी जीवनाचा पट वेगवेगळे घटना-प्रसंग दाखवून उलघडून दाखविला आहे. 'जागर' कादंबरीतून प्रेमानंद गज्वी एका दलित स्त्रीवर होणारा अत्याचार आणि या अत्याचारामुळे वाटेला लागलेला संसार याचे चित्रण करतात. पतीच्या संशयी वृत्तीचा गैरफायदा हा सवर्ण समाजातील पाटील घेताना दिसतो. 'घराण तमासगिराचं' या कादंबरीतून शशिकांत तासगावकर तमाशा या लोककलेवर पोट भरणाऱ्या एका घराण्याची चांगली कैफियत मांडताना दिसतात. 'मेलेलं पाणी' या कादंबरीतून ढोर, महार, मांग व चांभार या दलित समाजाचे चित्रण येते. कथानकात कोणतीही एक व्यक्ती केंद्रस्थानी नसून संपूर्ण दलित समाज केंद्रस्थानी आहे. दलितांचा व्यवसाय, कौटुंबिक,राजकीय, परिस्थिती, त्यांच्यातील श्रेष्ठकनिष्ठपणा त्यांचा दलितांना होणारा त्रास असे विविधांगी कथानक आकार घेताना दिसते. 'उलट चालिला प्रवाहो' या नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कांदबरीतून भयानक दुष्काळ पडलेल्या काळातच घोडेगावातील महार समाजावर सवर्णांकडून होणारा अत्याचार या कादंबरीत चित्रित केला आहे.

अशाप्रकारे आपण काही दलित तसेच दलितेतर लेखकांनी लिहिलेल्या काही निवडक कादंबऱ्यांचे कथानक पाहिले. यावरून असे दिसून आले की, काही कादंबऱ्या ह्या 'समिधा' सारख्याच आहेत तर काही भिन्न असलेल्या दिसून येतात.

ज्या पद्धतीने 'समिधा'मधून दलित-सवर्ण संघर्ष चित्रित झाला आहे त्याच पद्धतीने 'हाडकी-हाडवळा', 'बहिष्कृत', 'तणकट', 'मी माझ्या गावच्या शोधात', 'भाकरी आणि फूल' या कादंबऱ्यात येते. 'समिधा' या कादंबरीचा शेवट हा सवर्ण अत्याचार करण्यात यशस्वी होऊन ते पुढेही कार्यरत राहतात. परंतु मी माझ्या गावाच्या शोधात या कादंबरीतील नायकाला न्याय मिळतो. 'समिधा' मधून ज्या पद्धतीने सण, उत्सव, जयंत्या, श्रद्धा-अंधश्रद्धा, रूढी-परंपरा यांचे चित्रण आले आहे त्याचपद्धतीचे समाजजीवन 'हाडकी-हाडवळा', 'भाकरी आणि फूल', 'बहिस्कृत' या कादंबऱ्यांमधून आले आहे. तसेच घरादारांचे चित्रण ही 'तणकट', 'मी माझ्या गावाच्या शोधात' व 'बहिष्कृत' या कादंबऱ्यातून ज्या प्रकारचे आले आहे त्याच पद्धतीने 'समिधा' मधूनही आले आहे. त्यामुळे तेथील दलितांत समाज, त्यांचे राहणीमान हे नजरेसमोर आल्यावाचून राहत नाही. गावकीच्या कामाच्या वेळी होणाऱ्या त्रासाचे चित्रण 'हाडकी-हाडवळा', 'जातीला जात वैरी' तसेच 'समिधा' या कादंबऱ्यांमधून येताना दिसते. दलित समाजातील लोकांना अस्पृश्यतेची वागणूक देणारे सवर्ण समाज 'समिधा' आणि 'भाकरी आणि फूल' मधून चित्रित होतो. तसेच दलित चळवळीचे चित्रण 'भाकरी आणि फूल', 'त्रिशंकू' व 'बहिष्कृत' या कादंबऱ्यांमधून होताना दिसते. 'कार्यकर्ता', 'कुस्ती', 'कोंडी', 'काळगर्भ', 'श्राद्ध' व 'मी माझ्या गावाच्या शोधात' या कादंबऱ्यांमधून दलित तरूण पिढीचे चित्रण होताना दिसते. त्याच पद्धतीचे चित्रण 'भाकरी आणि फूल', 'बहिष्कृत' आणि 'समिधा' या दलितेतरांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमधून येताना दिसते.

बहिष्कृत मधील नायक हा जातीने महार आहे. तो आंबेडकरांचा भक्त आहे. परंतु त्याने धर्मांतर केलेले नाही. दत्ता भगत यांचे याविषयी असे मत आहे

की, जरी त्याने धर्मांतर केले नसेल व तो आंबडकरांचा अभिमान बाळगत असेल किंवा बाळगू शकतो यावर महार समाजाचा विश्वास नाही म्हणून ते बहिष्कृतमधील कथानकाविषयी म्हणतात की, ''लेखकाने नायक हा हिंदू, महार, आंबेडकरांचा अभिमानी पण धर्मांतर न केलेला असा का दाखवला ? खरे म्हणजे नायकाचे हे वेगळेपण दलित संघटन तयार करताना आड येऊन वैचारिक ठिणगी तरी पडायला हवी होती पण इथे तसेही घडले नाही. दलित समाजाच्या वस्तुस्थितीचे आकलन नीटसे झालेले नसल्यामुळे लेखकाकडून अशी चूक झाली असावी.''[४] भगत यांचे हे मत अगदी योग्य वाटते. 'तणकट'मधील नायकासंदर्भात देखील हेच घडते आणि 'भाकरी आणि फूल' मधील नायक हा देखील आंबेडकरी विचारांचे पालन करतो. परंतु त्यानेही धर्मांतर केलेले दिसत नाही. त्याचप्रकारे 'समिधा' मधील नायक देखील आंबेडकरी विचार आपल्या समाजात पेरण्याचे काम करून त्याच पद्धतीने वर्तन करण्यास भाग पाडतो. परंतु त्यानेही धर्मांतर तर केलेलेच नाही पण तो देवधर्म पाळताना दिसून येतो.

अशाप्रकारे काही निवडक कादंबऱ्यांचे कथानक पाहून 'समिधा'चे कथानक पाहिले. कथानकाच्या दृष्टीने दलितेतर लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमध्ये 'भाकरी आणि फूल' ही कादंबरी श्रेष्ठ वाटते. तरीदेखील 'समिधा' कादंबरीतून दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण करून अस्सल ग्रामीण दलित जीवनाचे चित्रण करण्याचा परिपूर्ण प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यामुळे आशयाच्या दृष्टीने 'समिधा'चे स्थान लक्षणीय ठरते.

**व्यक्तिचित्रण :**

कादंबरीतील व्यक्तिचित्रण हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. पात्राशिवाय कादंबरीला उठावदारपणा येत नाही. त्याकरिता लेखक पात्रांची निर्मिती करतो. कादंबरीमध्ये कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तीच्या कुटुंबाभोवती कथानक फिरते. तसेच मुख्य व गौण पात्रांची निर्मिती लेखक करतो. प्रस्तुत प्रकरणात काही दलित तसेच दलितेतर लेखकांनी लिहिलेल्या निवडक कादंबऱ्यांमधील पात्रांच्या अनुषंगाने 'समिधा' या देसाई यांच्या कादंबरीतील पात्रांचे स्थान ठरवायचे आहे. दलित समाजजीवनावर लिहिलेल्या कादंबऱ्यांमधून दोन प्रकारच्या व्यक्तिरेखा दिसून येतात. समिधा या कादंबरीमध्येही दलित समाजातील व्यक्तिरेखा व सवर्ण समाजातील व्यक्तिरेखा अशा प्रकारच्या व्यक्तिरेखा दिसून येतात. तसेच मुख्य व गौण आणि सत्प्रवृत्तीच्या व दुष्टप्रवृत्तीच्या अशाप्रकारे व्यक्तिरेखांचे वर्गीकरण करून लेखकांनी पात्रांची निर्मिती केली आहे.

'हाडकी-हाडवळा' या कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा 'बायजा' ही आहे. दलित स्त्रीची शोकांतिका लेखकाने 'बायजाच्या माध्यमातून चित्रित केली आहे. बायजाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे धैर्यशील, बेडर व स्वाभिमानी स्त्रीचे व्यक्तिचित्रण आहे, तिचा स्वभाव हा सडेतोड व स्वाभिमानी असल्याने तिच्याशी प्रतारणा करण्याचे धाडस कोणी करत नाही. मनबा हा तिच्यावर झोपेत बलात्कार करतो म्हणून ती सूड भावनेने पेटून उठते व त्याचा खून करण्याचा निर्धार करते. त्यावेळी मनबाला शोधून काढतानाचा एक प्रसंग लेखकाने रेखाटला आहे. बायजावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो बायजाच्या धाडसी वृत्तीमुळे तिच्या

तावडीतून निसटून जातो. जेव्हा ती एकमेकांच्या समोर येतात तेव्हा बायजा नागवीभप्प होऊन मनाबासमोर नाचू लागते व बरळू लागते की,

"मही भूक लागली नव्ह तुला ?
मग ये ना ?
तुहा आत्मा थंड होऊ दे !
कसा वळखशील तु आया बहिनी."[५]

तिच्या या वर्तनाला घाबरून मनबा गोंधळून जातो व तिच्या तावडीतून सुटून डोहात जाऊन जीव देतो. बायजाच्या या वागण्यातून लेखकाने अगदीच ढोबळपणा चित्रित केल्याचे जाणवते. त्यांचे हे चित्रण अवास्तव भासल्याखेरीज राहत नाही. यामधील दुसरी व्यक्तिरेखा म्हणजे सावळा हरी हा दलित मुलांचा प्रतिनिधी आहे. 'हाडकी-हाडवळा' बळकावल्यामुळे सवर्ण विष्णुपंताबद्दल त्याच्या मनात चीड आहे. त्याच्या या रागाने तो आपल्या मित्रांना घेऊन नह्यारातील विहिरीत आंघोळ करतो. विष्णुपंताशी तो उपहासाने बोलतो. श्रावण मास्तर हा बायजाचा भाऊ सुशिक्षित असल्याने त्याला कायद्याचे ज्ञान आहे. 'हाडकी-हाडवळा' बळकावल्याच्या कारणावरून तो विष्णुपंतांविरूद्ध तक्रार नोंदवतो. परंतु विष्णुपंताच्या डावपेचीमुळे त्याला कन्हेराच्या मुळ्याचा रस घेऊन आत्महत्या करावी लागते. पिढीजात हुकूमशाही हा गुण असल्याने धमकी व शाप देऊन लोकांच्या मनात तो भीती निर्माण करतो व आपले काम करून घेतो. त्याची जमीन बळकावून घेतो. मास्तरला मरायला भाग पाडून वाटेतला काटा काढून टाकतो आणि दलित मुले विहिरीत आंघोळीला जातात म्हणून म्हणतो की, "अरे ब्राह्मणाच्या नादी लागलात तर तुमचं कालत्रयीही बरं होणार नाही."[६] विष्णुपंताच्या या वक्तव्यावरून

त्याच्या ब्राह्मणी वृत्तीचा प्रत्यय येतो. गंगड आजाच्या व्यक्तिचित्रणाबाबत गंगावणे म्हणतात की, ''वाळवंटात गारपाण्याचा झरा असावा तसं 'हाडकी-हाडवळात' सहृदयवत मानवतावादी व्यक्तित्व गंगड आज्याचे आहे.''[७] यावरून गंगड आजाचा मानवतावादी विचार दिसून येतो. एकूणच कादंबरीत श्रावण मास्तर व गंगड आजासारखी सत्प्रवृत्तीची माणसे तर मनबा व विष्णुपंतांसारखी दुष्टप्रवृत्तीची माणसे ढसाळांनी चित्रित केली आहेत.

'७२ मैल' कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा ही अशोक व राधाक्का ह्या आहेत. कादंबरीचा निवेदक हा लेखकच आहे. लेखकाला बालपणी सातारा ते कोल्हापूर हा केलेला पायी प्रवास आठवतो व त्या प्रवासातील भयानक आठवणी आठवतात. त्याच आठवणी '७२ मैल' च्या रूपाने लेखकाने चित्रित केल्या आहेत. लेखकाने वयाच्या बारा तेराव्या वर्षी केलेला हा प्रवास त्याला आठवतो. त्या प्रवासातील राधाक्का ही दलित स्त्री व तिची राणू, सुंदर, चंदर, चिमी, बायजी व विठ्ठल ही सहा मुलं यांच्या जीवनाची फरफट या कादंबरीतून दिसून येते. राधाक्का ही नवरा तुरूंगात असतानाही मुलांना जगवण्याकरिता तिची चाललेली फरफट व तीन मुलांच्या मृत्यूचे भीषण दु:ख पचवणारी व्यक्तिरेखा लेखकाने चित्रित केली आहे. या कादंबरीतून राधाक्का या व्यक्तिरेखेतून व्हटकर यांनी दारिद्रयाने खचलेल्या व पदरी आलेल्या दारिद्रयामुळे लाचार होऊन स्वत:ची आब्रू दुसऱ्याच्या हवाली करणाऱ्या दलित स्त्रीचे हृदयभेदी चित्रण केले आहे. ओंजळभर शेवेसाठी अतिकठीण प्रसंगातूनही राखून ठेवलेली मोलाची आब्रू एका हॉटेलवाल्याच्या स्वाधीन करते लेखकाला ती शेव नसून भाड वाटते. तेव्हा ती त्याला म्हणते की, ''आसुक्क्या...... तुम्ही शेव खाल्लीसा..... उदया ती हागून जाईल.... पण तुमची पोटं भरल्यावर तरी माझी

आब्रू आता ईल का ?''[८] राधाक्काच्या या वक्तव्यातून तिच्या मनाची झालेली शोकांत अवस्था लेखकाने चित्रित केली आहे. जीवनात आलेल्या बऱ्या-वाईट अनुभवातून ती शहाणी होते. अशाप्रकारे लेखकाने दारिद्रयाशी झुंज देत संसाराचा गाडा ओढत नेणाऱ्या व निरागसपणे जीवन जगणाऱ्या दलित स्त्रीचे चित्रण राधाक्काच्या रूपाने प्रतिकात्मक स्वरूपात चित्रित केले आहे. राधाक्काची मुलगी बायजी ही आपल्या आईला एका व्यभिचारी स्त्रीला बोलावे असे अपमानास्पद बोलते. जेव्हा राधाक्कावर आपले शील देण्याची वेळ येते तेव्हा ती लेखकाला म्हणते की, आपली सगळी मंडळी कुत्र्याच्या मरणानं मरताना मी पाहिल्यात तेव्हा मीच त्यांच्योपक्षा काय मोठी आहे कि निराळी. राधाक्काच्या या संवादातून असे जाणवते की, प्रत्येक दलित स्त्री ही राधाक्कासारखे लाचारीचे जीवन जगत आली आहे. या कादंबरीतदेखील फरारी दरोडेखोरासारखी सत्प्रवृत्तीची तर वासनेला आसुसलेल्या हॉटेलवाला, ट्रक ड्रायव्हर यासारखी दुष्टप्रवृत्तीची माणसे लेखकाने चित्रित केली आहेत.

लेखक राधाक्काच्या व्यक्तिरेखेबाबत म्हणतो की, ''तिला प्रेम,माया, ह्याशिवाय जणू भावना नव्हती ! ती काळी होती..... शांत पर्वतीही होती !''[९] अशा प्रकारची व्यक्तिरेखा लेखकाने चित्रित केली आहे. तसेच गाडीवान हा अस्पृश्यता पाळताना दिसतो. तो लेखकाची जात समजताच त्याला मारहाण करतो व गाडीतून हाकलून लावतो. यावरून त्याचा दुष्टपणा दिसून येतो.

'जातीला जात वैरी' या कादंबरीतील नायक हा निनावी आहे. दलित समाजातील श्रेष्ठ-कनिष्ठता त्यांच्यातील ताणतणाव तसेच त्यांच्या संबंधावर बोलणारा निवेदक हा नि:पक्षपातीपणे वागताना दिसतो.

'कार्यकर्ता' कादंबरीचा मुख्य नायक सदा हा समाजकार्याला वाहून घेताना दिसतो. काशीबाई नावाच्या दलित स्त्रीला कार्पोरेशनमध्ये नोकरी लावून तिच्या पोराचा प्रश्न सोडवतो. तसेच सावकाराने बळकावलेली जमीन जया महारणीला परत मिळवून देतो. रिपब्लिकन पक्ष गटागटात विभागलेला एकत्र यावा असे त्याला वाटते म्हणून तो शहरातील सभेत बोलणाऱ्या पक्षाच्या नेत्याला म्हणतो, ''साहेब आपल्या रिपब्लिकन पक्षाचं ऐक्य केव्हा करणार ?''[१०] यावरून एका परखड समाजकर्त्याची व्यक्तिरेखा सदाच्या व्यक्तिरेखेतून लेखकाने चित्रित केल्याचे दिसून येते. सदाचा हा प्रश्न साहेबाला आवडत नाही. साहेबाची माणसे सदाला मारहाण करतात व रक्तबंबाळ करतात. एका प्रामाणिक कार्यकर्त्यांची स्वार्थी, संधीसाधू, आपमतलबी नेत्यांच्यामुळे इच्छा अपूरी राहते. सदा ही या कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा आहे. तर गुरूजी ही व्यक्तिरेखा यातील महत्त्वाची आहे. हे सुष्ट प्रवृत्तीचे पात्र आहे तर ही दलित नेतेमंडळी दुष्ट प्रवृत्तीची आहेत. यातील सदाचे व्यक्तिचित्रण अगदी उठावदार आले आहे.

'मी माझ्या गावाच्या शोधात' कादंबरीतील मुख्य नायक आनंदा हा आहे. सवर्णांच्या अन्याय-अत्याचाराला घाबरून, त्याने बहिष्कार टाकल्यामुळे पळून जाणाऱ्या आपल्या गावाच्या व आई-बापाच्या शोधार्थ जेव्हा आनंदा निघतो तेव्हा वाटेत ज्या-ज्या ठिकाणी दलितांवर अत्याचार होतील त्या-त्या ठिकाणी संघर्षास प्रवृत्ती होतो व गावकुसाच्या तटाची भिंत पाडून टाकतो. सोनाबाय नावाच्या दलित स्त्रीची आब्रू वाचवतो आणि त्याच्यावर अत्याचार करणाऱ्याला तो ठार मारतो अशा प्रकारच्या विद्रोही स्वभावाची व्यक्तिरेखा यामध्ये दिसून येते. न्यायासाठी व स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या एका दलित तरूणाचे चित्रण लेखकाने आनंदा या

व्यक्तिरेखेतून केले आहे. आनंदा आपल्या घराचे वर्णन करताना म्हणतो, घर म्हणण्याऐवजी खोपाटच म्हणणे योग्य. डोक्याइतक्या उंच भिंती, वरचे छप्पर नदीतल्या पानकणसी गवताने शाकारलेले असते. आतल्या बाजूला मजबूतपणा येण्यासाठी मेटीचा आधार दिलेला असतो. यावरून आनंदाच्या परिस्थितीची जाणीव होते. या कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखांपैकी मुख्य व्यक्तिरेखा म्हणजे सोनाबाय ही आहे. 'सोनाबाय' ही आपल्या आई-वडील व भावासोबत ऊसतोडणीचे काम करते. गावचा मळ्याचा मालक रावराजा हा सवर्ण जातीतला आहे. सोनाबायचा भोग घेण्याची त्याची इच्छा आहे. तो एक दिवस संधीचा फायदा घेऊन तिला पळवून आपल्या मळ्याच्या घरात नेतो आणि तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करतो. जेव्हा ती त्याला शिव्या देऊन हा प्रसंग टाळण्याचा प्रयत्न करते तेव्हा तो तिला म्हणतो की, ''अग तू तर खालच्या जातीची.... तुला ग काय त्याचं ?''[११] तेव्हा सोनाबाय म्हणते की, खालच्या जातीच्या बाईला आब्रू नसते का ? असे म्हणून शिव्या घालते. परंतु तो म्हणतो की, ''अग ! तुला कशाची आब्रु ! इज्जत ! कुठही अशी उघड्यावर पडणारी तू !''[१२] रावराजाच्या या वक्तव्यातून दलित स्त्री ही सवर्णांची फक्त एक भोगवस्तू आहे असे लेखकाने सूचित केले आहे. रावराजाच्या व्यक्तिरेखेतून एका दुष्टप्रवृत्तीची व्यक्तिरेखा चित्रित केली आहे. तर सोनाबाय व राधाबाय ह्या धाडसी, बेडर व स्वाभिमानी दलित स्त्रियांचे लेखकाने व्यक्तिचित्रण केले आहे.

'कुस्ती' कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा प्रकाश गायकवाड ही आहे. अमृता व गंगाबाई यांचे हे एकुलते एक अपत्य. प्रकाश हा आपले मुळ गाव चांदणी हे सोडून शिक्षणासाठी व नोकरीसाठी बीड शहरात जाऊन राहतो. प्रकाशचे प्रेम एका

मिनाक्षी नावाच्या ब्राह्मण मुलीवर आहे. परंतु तो त्याची मामेबहीण रमा हिच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेतो. कारण रमा ही बेआब्रू झालेली दलित स्त्री आहे. अशा मुलीला कुणी स्वीकारू शकणार नाही याची खात्री असल्याने प्रकाश हा निर्णय घेतो. यावरून त्याचा समंजसपणा दिसून येतो. प्रकाश हा 'दलित युवक मोर्च्याचा' जिल्हा सचिव आहे. परंतु प्रकाश रमाच्या बलात्काराच्या केसच्या बाबतीत तो काही करू शकत नाही. इथे मात्र नायक कुठेतरी कमी पडताना दिसतो. चळवळीतील इतर लोकांचा विरोध असूनही त्याला मांग समाजातील तरूणांनी चळवळीत भाग घ्यावा असे वाटते. तेव्हा मात्र त्याला संघटनेतून काढण्यात येते. यावरून लेखकाने एका स्वातंत्र्योत्तर सुशिक्षित दलित तरूणाचे चित्रण केल्याचे दिसून येते. 'कुस्ती'मधून लेखकाने काही सुष्ट प्रवृत्तीची तर काही दुष्ट प्रवृत्तींची पात्रेही रेखाटली आहेत.

शिवा हा प्रकाशचा जिवलग मित्र आहे. तो सवर्ण असूनही प्रकाशशी मैत्री करताना दिसतो, इथे जातीयतेला तडा दिल्याचे दिसून येते. मिनाक्षी ही उच्चवर्णीय असूनही प्रकाशसारख्या दलित तरूणावर जिवापाड प्रेम करते व आपले पूर्ण आयुष्य त्याच्या सोबत घालविण्याचा निर्णय घेते. इथेही जातीयतेला पूर्णपणे नाकारल्याचे दिसून येते. परंतु प्रकाश जेव्हा रमाशी लग्न करण्याचा निर्णय घेतो तेव्हा नाराज होऊन त्याला ती बोलते.

कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखेतील मुख्य व्यक्तिरेखा रमा ही आहे. रमा ही प्रकाशच्या मामाची एकुलती एक मुलगी आहे. तिचे प्रकाशवर प्रेम असूनही व्यक्त न करता ती गप्प राहते. रमा प्रकाशच्या आई-वडीलांसोबत शिवाच्या मळ्यात कामाला जात असते. सुभानरावांचा मुलगा नारायण व त्याचा मामा वसंता या दोघांची रमाचा भोग घेण्याची इच्छा आहे. प्रकाश शहरात असताना निराधार

रमाच्या घरी जाऊन तिच्या आई-बापाला मारहाण करून मांजरा नदीच्या वाळूत आणून तिच्यावर हे दोघे बलात्कार करतात. पोलिस जेव्हा चौकशीसाठी येतात तेव्हा ती प्रकाशला काहीही न सांगण्यास खुणवते व म्हणते की, ''एक पका तुला माझी आण हाय, कुणाला म्हणचीन त माझ मांस खाचीन. मपल्यामुळं ते मपल्या मायबापाचं तुकडं करतेन.''[१३] यावरून तत्कालीन दलित स्त्रियांचे मानहानीचे, लाचारीचे जीवन लेखकाने रमाच्या व्यक्तिरेखेतून चित्रित केले आहेत. या कादंबरीत शिवासारखी सवर्ण पण सत्प्रवृत्तीची व्यक्तिरेखा लेखकाने चित्रित केली आहे. शिवा जेव्हा नारायण व वसंत यांच्या सांगण्यावरून आपली कामवासना भागवण्यासाठी रमाच्या घरी येतो तेव्हा रमा त्याला राखी बांधते आणि साखर खायला देते तेव्हा तो शरमेने चुरचुर होतो व तिला म्हणतो की, ''मपल्या तोंडात श्यान घाल, साखर नकू रमे लई झटका दिलास बाई तू अरं मर्दा शिव्या हिरीत जीव दी !''[१४] यावरून एका सत्प्रवृत्त व्यक्तीचे चित्रण केले आहे. शिवासारख्या ठिकाणी नारायण किंवा वसंतासारखा कोणी असता तर रमाने बांधलेल्या राखीचा मान न राखता तिला बेआब्रू करण्याचा हा क्षण दवडला नसता. कुस्तीमधून सुभानराव व सरपंच कचरु पाटीलसारख्या सत्प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा लेखकाने रेखाटल्या आहेत. तसेच नारायण व वसंता सारख्या दुष्टप्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा लेखकाने रेखाटल्या आहेत. कचरू पाटील ही सहनशील व कनवाळू व्यक्ती आहे. प्रकाशचा बाप जेव्हा गावकी मागायला लहानशा प्रकाशला घेऊन जायचा तेव्हा तो म्हणायचा, ''अमृता, ह्या पोराला साळात घाल मर्दा हे पोरग शिकन बग ह्यास्नी गावकी मागायला नकू बरूबर घेऊन हिंडू.''[१५] यावरून त्याचा कनवाळूपणा दिसून येतो. रमावर बलात्कार होऊनही ते काही करू शकत नाहीत तेव्हा प्रकाश म्हणतो की, रमापेक्षाही सुंदर मुली

चांदणी गावात होत्या. परंतु रमा हीच त्यांना सहज वाटली. कारण पोलिसांकडे तक्रार द्यायची त्यांची हिंम्मत नाही व दिली तर कोर्टकचेऱ्या त्यांना परवडणाऱ्या नाहीत. यावरून एक दलित स्त्रीची होणारी कुचंबना लेखकाने रमाच्या माध्यमातून चित्रित केली आहे.

'बहिष्कृत' कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा अशोक इंगळे ही आहे. अशोक इंगळे हा दलित आहे. अशोक हा नोकरीकरिता 'हिदगाव' या ठिकाणी रूजू होतो. जेव्हा त्याला तेथील दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची जाणीव होते तेव्हा तो दलितांना त्यांचे स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या प्रयत्नात तेथील सवर्ण लोकांबरोबर वैर घेतो व यातच त्याला आपला जीव गमवावा लागतो. अशोक हा आंबेडकरी विचाराचा आहे परंतु त्याने धर्मांतर केलेले नाही. अशोकच्या व्यक्तिचित्रणासंदर्भात डॉ. र.बा. मंचरकर म्हणतात, ''व्यक्तिजीवनाची अनेक वर्तुळे आखली जातात आणि त्यातून त्यांना पोटात घेणारे भव्य वर्तुळ रेखले जाते. निरनिराळ्या व्यक्तींच्या जीवनकहानीतील संबंद्ध भागामुळे समूह जीवनाचे एकात्म चित्र उभे राहते.''[१६] या व्यक्तिरेखेतून समूहदु:ख चित्रित होताना दिसते. सुष्ट व्यक्तींच्याबरोबर दुष्ट व्यक्तींचा होणारा संघर्ष यातून सामुहिक संघर्षाचे दर्शन घडते. बहिष्कृत कादंबरीतील सुकड्या, रूपा,देवराज ही दलित मंडळी तर रघोजी, देशमुख, कुलकर्णी, हेडमास्तर, देशमुखीनबाई व कुलकर्णी हेडमास्तर यांची पत्नी तसेच शाळेतील कर्मचारी वर्ग हे सर्व सवर्ण जातीतील आहेत. रघोजी देशमुख हा हुकुमशाही गाजविणारा गावातील एक बडं प्रस्थ असणारा आहे. त्याला असे वाटते की दलितांना त्याचे हक्क अधिकार मिळाले पाहिजेत. परंतु आपल्या मनाप्रमाणे व आपल्या आशिर्वादाने सर्व झाले पाहिजे. आपण जेवढ देऊ तेवढंच स्वातंत्र्य दलितांनी घेतलं पाहिजे. रघोजी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

देशमुख हा ग्रामीण भागातील सवर्णीय नेतृत्त्वाचा एक प्रतिनिधीक नमुना असल्याचे दिसते. कुलकर्णी हेडमास्तरची पत्नी ही अस्पृश्यता पाळताना दिसते. तर रघोजी देशमुखांची पत्नी त्यांना चहा-पाणी, जेवण अगदी मनात कोणतीही शंका न आणता करताना दिसते. परंतु त्याच्या मुलीची इंग्रजीची शिकवणी अशोकने घ्यावी असा आग्रह तिचा असतो. तिच्या आग्रहाखातर व अशोकने या गोष्टीला दिलेल्या नकारावरून देशमुख संघर्षाला सुरूवात करतो. देशमुखीणबाई पंचेचाळीस वयाची प्रौढ असली तरी ती वीस वर्षाच्या अशोकला आवडावी इतकी सुंदर आहे. परंतु रघोजी हा शिशवी रंगाचा, धबाड नाकअसलेला आणि जाडजूड ओठाचा कुरूप गडी आहे. म्हणून तो बायकोची प्रत्येक मागणी पुरविताना दिसतो. परंतु देशमुख हा कुलकर्णीच्या मुलीवर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. कुलकर्णी देशमुखांना या बाबतीत प्रतिकार करताना दिसत नाही. कुलकर्ण्यांच्या व्यक्तिरेखेतून एक समजुतदार पिता व कर्तव्यदक्ष पती ही भूमिका दिसून येते. ते अस्पृश्यता पाळत नाहीत. परंतु अस्पृश्यता पाळणाऱ्या आपल्या पत्नीला विरोधही करत नाहीत. कुलकर्णी मास्तरच्या या वागण्यावर वाचकांच्या मनात कीव निर्माण होते.

अशोकच्या व्यक्तिरेखेबाबत प्रा. दत्ता भगत म्हणतात की, ‘‘हौतात्म्यामुळे उदात्त झालेले नायक सर्वसामान्य माणसाला नेहमीच आवडतात. पाणवठ्याच्या प्रश्नावर हुतात्मा झालेला अशोक वाचकांचे मन जिंकून घेतो. पण ह्या हौतात्म्यामुळे पाणवठ्याच्या प्रश्नावरून ग्रामीण भागात दलितांची, एखाद-दुसऱ्या चवरसारख्या सेवादलीय व्यक्तीची जी भीषण कोंडी झालेली आहे त्या वास्तवापासून कादंबरी दूर सरकते.’’[१७]

अशा प्रकारे लेखकाने दलित-सवर्ण संघर्ष चित्रित करताना काही सुष्ट व दुष्ट सवर्ण व्यक्तींची रेखाटने केली आहेत.

'तणकट' कादंबरीतील व्यक्तिरेखांची संख्या जास्त आहे. कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा कबीर ही आहे. हा दलित तरूण आहे. दलितांना सोबत घेऊन सवर्णांशी भांडण काढणारा सवर्ण बाळासाहेब शेडबाळे समंजसपणाने वागणारा आक्काबा राणे, शेडबाळेबरोबर विवाहबाह्य संबंध ठेवणारी सुली महारीण ह्या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. दुय्यम व्यक्तिरेखेमध्ये तानू आजी, थळू आजा, रामा महार, आयुष्या महार, कबीरचे आई-वडील या दलित व्यक्तिरेखा आहेत. तर गौत्या, पंढऱ्या, पांड्या ही गावातील उडाणटप्पू दलित मुले, जयाप्पा कांबळे, राजा कांबळे, दयानंद रत्नाकर हे दलित आणि सवर्ण बल्लाळ हे नायक कबीरचे मित्र. प्रा. अवचित भालेराव, जालिंदर बनसोडे, आनंदा कांबळे ह्या चळवळीत काम करणाऱ्या व्यक्तिरेखा आहेत. तसेच गणपत पाटील, डेअरीचे चेअरमन बापू पाटील,किसन शिंदे,जानबा मास्तर ही गावातील सवर्ण मंडळी आहेत.

कादंबरीतील सवर्ण व दलित व्यक्तींचे वर्तन स्वाभाविक वाटते. कारण त्या जुन्या विचारांच्या आहेत. गावातील सवर्ण लोकांचे स्वभाव, राजकारण त्यांचा दलित समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन राजन गवस सवर्ण व्यक्तिरेखांच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे चित्रित करताना दिसतात. शेडबाळे व सुली यांचे संबंध पाहून त्याच्या घरच्या लोकांचे वागणे स्वाभाविक वाटते. आपुन्या महाराची म्हैस आण्णाप्पाच्या पिकात घुसते म्हणून आण्णाप्पा त्याच्या म्हैशीला बेदम मारतो. या संधीचा फायदा घेऊन दलित चळवळीतील मंडळी सवर्णांसोबत संघर्षाला सुरूवात करतात. पोलिस येऊन आण्णाप्पाला घेऊन जातात. जेव्हा आपुन्याची बायको

त्याला ही बातमी सांगते तेव्हा अपुन्या म्हाताऱ्याची भीतीने घाबरगुंडी उडते व त्याला हुडहुडी भरल्यागत होते. लेखकाने यावेळचं चित्रण अगदी सुरेख केले आहे. ते चित्रण चित्रित करताना म्हणतात की, ''म्हाताऱ्याच्या घशात शिप्पीनं हळूळळू तिनं साखरपाणी वतायला सुरूवात केली. तसा म्हातारा थोडासा सावरला. त्याचं तोंड हालाय लागलं. फक्त पुटपुटला 'वाईट झालंऽऽ आता बरं व्हईत न्हाई' आणि पुन्हा त्यांच अंग हालाय लागलं. म्हातारी जोरानं ओरडली. 'तू गप्प झोप बघूऽऽ' म्हातारा निपचित पडला. एवढ्यात कुडाच्या पाकाड्यातली पाल चुकचुकली. 'किस्नंऽऽ किस्नंऽऽ' म्हातारीच्या तोंडातन बाहेर पडलं. 'घात झाला' म्हातारा एकदम किंचाळत पुन्हा उठून बसला. त्याच्या घशात कोरड पडली. त्याला बोलताही येईना.''[१८] यावरून सवर्णांच्या अरेरावीला व हुकुमशाहीला दलित किती घाबरतात याचे दर्शन घडते. लेखक नायकाच्या दारिद्र्याचे चित्रण करताना म्हणतो की, ''कबीरन खोपटाच दार लावून घेतल, दार कसल ? उभा केलेलं पत्र्याच पान. कुलूप लावायला तो विसरला नाही. कशाला लावायचे कुलूप ? काय घेऊन जाणार आपल्या खोपटातून कोण ? चार गाडगी आणि फाटकी कापड. जमवलेलं खिडूक मिडूक.''[१९] यावरून लेखकाची बिकट परिस्थिती दिसून येते. या वर्णनातून लेखकाने भीषण दारिद्र्याचे चित्रण केले आहे.

'भाकरी आणि फूल' या कादंबरीतून कर्णिक यांनी तीन पिढ्यांचे चित्रण केले आहे. शिवनाक आणि मोन्या ह्या जुन्या पिढीतील दलित व्यक्तिरेखा तर गोपाळ, पांडुरंग आणि आनंद ह्या स्वातंत्र्योत्तर नव्या पिढीतील दलित तरूण व्यक्ति-रेखा लेखकाने चित्रित केल्या आहेत. ह्या तरूण व्यक्तिरेखा आंबेडकरी विचाराने भारावलेल्या आहेत. त्यामुळे ह्या व्यक्तिरेखा अतिशय महत्त्वाच्या आहेत. शिवनाक

हा गोपाळ, पांडूरंग व आनंद यांचा बाप आहे. ही त्यांची मुले चळवळीत काम करताना दितसात. कारण ती शिकलेली आहेत. कादंबरीचा मुख्य नायक गोपाळ हा आंबेडकरी विचाराचा असल्याने आपल्या कुटुंबानेही तसेच वागावे असे त्याला वाटते. पांडूरंग आणि आनंद हेही आंबेडकरांचा आदर करतात. परंतु शिवनाक हा जुन्या पिढीतला असल्याने तो जुन्या परंपरेने वागण्याचा प्रयत्न करतो. हे गोपाळला आवडत नाही. तो मुंबईहून परत येतो तेव्हा आपल्या घरात बापाने मेलेल्या बैलाचे मांस (पड) आणल्याचे समजते. तेव्हा तो चिडतो आणि घरातील सर्वांना डॉ. बाबासाहेबांची शपथ घ्यायला सांगतो. आजपासून या घरात कधीही हा प्रकार घडणार नाही. रामेश्वराच्या मंदीरात जाणेस सवर्ण विरोध करतात तेव्हा तो आपल्या लोकांना आपल्या हक्काची जाणीव करून देतो आणि म्हणतो , ''देवळात जाणे हा आपला हक्क आहे. तो आपण बजावला पाहिजे. मेलेल्या गुरांचे मांस 'पड' खायचे आपण बंद केले पाहिजे. मुलांना शाळेत घालून शिक्षण दिले पाहिजे, बाबासाहेबांची शिकवण मानली पाहिजे. आतापर्यंतचे शेणातल्या किड्यांसारखे जगणे बदलायचे असेल तर हा सारा बदल घडवून आणला पाहिजे.''[२०] यावरून एका दलित तरूणाचे प्रतिनिधीत्व करतानाचे चित्रण गोपाळच्या व्यक्तिरेखेतून दिसून येते.

यातील दुसरी महत्त्वाची व्यक्तिरेखा म्हणजे शिवनाक. शिवनाक हा जुन्या विचाराचा, रूढी परंपरा पाळणारा दलित माणूस. तो मेलेल्या बैलाचं मांस घेण्यास जातो तेव्हा पांडुरंगला हे आवडत नाही. तेव्हा शिवनाक त्याला म्हणतो की, ''शाना हस तू ! वाडवडील ह्याच खायत हुते. आम्ही ह्याच खायत न्हानाचे मोटे झालंय्... तुमका बकरा नि कोंबडा होया, तो देणार कोन ? ह्याच आपला अन्न... तेच करालो करू नये. चल, वगीच बडबड नुको.....''[२१] शिवनाकच्या या संवादावरून

त्याचा लाचारीपणा व दारिद्रय दिसून येते. तो स्वत:ला सवर्णांपेक्षा खूपच तुच्छ लेखतो. सवर्ण हे आपले माय-बाप आहेत असे त्याला वाटते. म्हणूनच तो मुंबईत खोताच्या बायकोने दिलेले जुने कपडे हावरटपणाने घेतो. यावरून त्याचे दारिद्रय किती भयानक आहे हे दिसून येते.

गोपाळ, पांडुरंग आणि आनंद या व्यक्तिरेखांबाबत डॉ. रवींद ठाकूर म्हणतात की, ''शिवनाकला विरोध करीत हक्कासाठी झगडणारा गोपाळ परीस्थितीच्या रेट्यामुळे पुढे तडजोडवादी झालेला दिसतो. पांडुरंग सामंजस्याच्या मार्गाने जाणारा समन्वयवादी आहे तर आक्रमक व विद्रोही विचारांनी प्रभावित झालेला आनंद हा नव्या पिढीचा प्रतिनिधी आहे.''[२२] डॉ. ठाकूर यांचे हे मत अगदी योग्य आहे. या व्यक्तिरेखेतून लेखकाने आंबेडकरी चळवळीमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामीण खेड्यात जे त्यांच्या विचाराचे पडसाद उमटले आहेत त्याचे हे वास्तवचित्र असल्याचे दाखवले आहे.

या कादंबरीतील सवर्ण व्यक्तिरेखांपैकी काही सत्प्रवृत्तीच्या तर काही दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा आहेत. त्यापैकी ताई बामीण व तिचा मुलगा व सून हे आपल्या घरी आलेल्या शिवनाक व मोन्या महार यांचा पाहुणचार अस्पृश्यता न पाळता करतात तर त्याची बायको आपल्या घरातील जुनी कपडे त्यांना देते यावरून त्यांचा सहानुभूतीने दलितांकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिसून येतो. परंतु आबू खोत हा सवर्ण मात्र दुष्टप्रवृत्तीचा आहे. तो धुर्पती व तिची मुलगी वेणू ह्यांच्याविषयीची मनात वाईट विचार आणतो. तसेच तो अस्पृश्यताही खूप पाळताना दिसतो. गोपाळ जेव्हा रामेश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तो त्याला शिवीगाळ करतो व म्हणतो, ''गोपग्या म्हारा ! मायझया, तु पैलो ह्यासून खाली हो ! हंच तुका

येण्याची अधिकार नाय."[२३] आबू खोताच्या या व्यक्तिरेखेतून तत्कालीन सवर्णांची दलितांकडे पाहण्याची दुषित दृष्टी कशी होती याचे चित्रण लेखकाने केले आहे.

गोपाळच्या बहिणीची विटंबना होऊनही गोपाळ काही करू शकत नाही. कारण त्याला वाटते, आपण बहिणीजवळ चार दिवसांपेक्षा जास्त राहू शकत नाही. आपण तिथून निघून आलो तर आपल्या बहिणीची व तिच्या नवऱ्याची गाठ तिच्या गावातील विटंबना करणाऱ्या नालायक लोकांशीच आहे. तेव्हा आपण जर काही हालचाल केली तर ते पुन्हा त्यांना त्रास देतील असे त्याला वाटते. गोपाळचे हे मत अगदी योग्य आहे.

दलित व्यक्तिरेखेमध्ये मोन्या, जिजी म्हारीण, भादूर, मायनाक व धोंडनाक ही पहिली पिढी. शिवनाक, मोन्या, शिदनाक, काळ्या व धुर्पती ही दुसरी पिढी तर पांडू गोद्या, पुतळी, गोपाळ, आनंद, भिक्या, लक्ष्मण, बाळू व अर्जून ही तिसरी पिढी इत्यादींचा समावेश होतो.

सवर्णांमध्ये यशा बामण, ताई सुतारीण, ताई बामीण, बाबी भटजी, आबू खोत इ. व्यक्तिरेखा लेखकाने चित्रित केल्या आहेत.

'समिधा' या कादंबरीतून लेखकाने मुख्य व दुय्यम व्यक्तिरेखांची निर्मिती करून 'रानगांव' या खेड्यातील दलित सवर्ण संघर्ष चित्रित केला आहे. या कादंबरीचा मुख्य नायक तुका हा आहे. संपूर्ण कादंबरीचे कथानक देवा महार या दलित व्यक्तीच्या कुटुंबाभोवती फिरताना दिसते. 'समिधा' मधील व्यक्तिचित्रणाविषयी सखोल विवेचन या लघु-प्रबंधिकेच्या दुसऱ्या प्रकरणात केले आहे. तेव्हा इथे या व्यक्तिचित्रणांचा फक्त सारासार विचार करणे योग्य वाटते.

या कादंबरीतील मुख्य व्यक्तिरेखा देवा, तुका व मुक्ता ह्या आहेत. मुक्ता ही सुंदर सालस, महत्त्वाकांक्षी, जिद्दी व हुशार अशी देवाची एकुलती एक मुलगी आहे. तुका हा कर्तृत्ववान आंबेडकरी विचाराचा नव्या वळणाचा देवाचा एकुलता एक मुलगा आहे. तर देवा हा जुन्या विचाराचा रूढी-परंपरा पाळणारा कुटुंबातील वृद्ध आणि जबाबदार दलित व्यक्ती आहे.

देवा हा जुन्या पिढीतला असल्याने तो सवर्णांची पडेल ती कामे आपले कर्तव्य समजून पार पाडताना दिसतो. यशवंत खोराटेची लाकडे फोडताना तहान लागते म्हणून तो खोराटेकडे चहा मागतो तेव्हा खोराटे त्याला रागाने म्हणतो, ''ठेवलाय तुझ्या बानं ! तालेवार लागून गेलाय चा प्यायला. एक टाईम चा द्यायची बोली हाय. खिशात पैसे असले तर चा मागावा. समजंल ?''[२४] यावरून देवाचा लाचारीपणा व दारिद्रयपणा दिसून येतो. तर खोराटेचा मग्रुरीपणा दिसून येतो. कष्टाची कामे करवून घेऊन दलितांना उपासी मारणारे सवर्ण या व्यक्तिरेखेतून चित्रित होतात. तुका हा आंबेडकरी विचाराचा नव्या पिढीतला नवा तरूण असल्याने तो बेडर स्वभावाचा व कणखर वृत्तीचा आहे. मुंबईहून परत आल्यावर खोराटेच्या हॉटेलात चहा पिण्यासाठी जातो तेव्हा तुका हॉटेलमध्ये जाताना म्हणतो की, लावलेली पाटी खरी आहे की खोटी आहे, तेव्हा खोराटे म्हणतो की,

''खरी हाय ! खोटी नवं ! का इचारलंस ?''[२५]

''न्हाई ! माझा बा दारातल्या कपान चा प्यायचा आमी तुमच्या हाटेलात यायचं आणि तुमी आमाला हाकलायच !'' यावरून तुकाच्या माध्यमातून एका बेडर व कणखर वृत्तीच्या दलित तरूणाचे चित्रण लेखकाने केल्याचे दिसून येते.

मुक्ता ही दिसायला सुंदर असल्याने रानगावातील देशमुख व त्याची चांडाळ चौकडी यांची तिचा भोग घेण्याची इच्छा असते. मुक्ता एस.एस.सी. पास होऊन नर्सची नोकरी पत्करते. आपण नेहमी स्वच्छ रहावे, शिकावे व स्वत:च्या पायावर उभे रहावे अशी तिची इच्छा असते. परंतु सवर्णांची ही चांडाळचौकडी मुक्ताच्या दीड वर्षात चार ठिकाणी बदल्या घडवून आणतात आणि तिच्यावर बलात्कार करण्यात यशस्वी होतात. मुक्ताला कोर्टात खटला चालवूनही न्याय मिळत नाही. त्यांची मात्र निर्दोष मुक्तता होते. मुक्ताच्या व्यक्तिचित्रणातून एका दलित स्त्रीची शोकांतिका लेखकाने चित्रित केली आहे. 'समिधा' मधून शेवंता या व्यक्तिचित्रणातून एका दलित व्यभिचारी स्त्रीचे चित्र रेखाटले आहे. तसेच सुशिला मावशी, भोळे गुरूजी, फादर जॉन व रावजी कांबळे या व्यक्तिचित्रणातून सत्प्रवृत्तीच्या व्यक्ती चित्रित केल्या आहेत. तर रामगावचा सरपंच भगवंतराव देशमुख, यशवंत खोराटे, बंडू पुजारी, रूद्र तेली, महिपतराव नागनाळे, विश्वासराव खंबाटे या सवर्ण समाजातील दुष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तिरेखा लेखकाने चित्रित केल्या आहेत. यांच्यापासून देवाच्या कुटुंबाला व संपूर्ण दलित समाजाला त्रास होताना दिसतो.

अशाप्रकारे समिधा आणि काही निवडक कादंबऱ्यांमधील व्यक्तिचित्रणाचा अभ्यास केला. यावरून असे दिसून आले की, 'समिधा' मधील नायक तुका हा जसा विद्रोही भूमिका घेणारा नव्या पिढीतला दलित तरूण आहे त्याच पद्धतीचा नायक 'बहिष्कृत', 'तणकट', 'मी माझ्या गावाचा शोधात', 'भाकरी आणि फूल' या कादंबऱ्यातून दिसून आला. तसेच देवा हा जुन्या पिढीतला जुन्या वळणाचा दलित माणूस 'समिधा' मधून लेखकाने ज्या पद्धतीने चित्रित केला आहे त्याच

पद्धतीची व्यक्तिचित्रणे 'भाकरी आणि फूल' मधून आली आहेत. तसेच काही कादंबऱ्यांमधून सवर्ण लोक दलितांवर अन्याय अत्याचार करताना दिसतात. अशी दुष्ट प्रवृत्तीची तसेच सत्प्रवृत्तीचीही व्यक्तिचित्रणे लेखकांनी चित्रित केली आहेत. दलित स्त्रियांच्यावर अन्याय अत्याचार करणारे सवर्ण मात्र सर्वच कादंबऱ्यातून दिसून येतात. 'मी माझ्या गावाच्या शोधात' या कादंबरीतील नायकाला सोडले तर एकाही कादंबरीतील नायकाला न्याय मिळताना दिसत नाही. तसेच आपल्याच समाजातील लोक आपल्याला विरोध करणारे दलित समाजात दिसून येतात. या सर्व व्यक्तिचित्रणांमध्ये 'समिधा'मधील व्यक्तिची निर्मिती ही लेखकाने प्रतिकात्मक रूपाने केल्याचे दिसून येते.

**भाषा :**

साहित्याचे माध्यम भाषा हे आहे. भाषेच्या व्यतिरिक्त साहित्य निर्मिती करणे केवळ अशक्य आहे. दलित लेखक जे लेखन करतो त्याच्या साहित्यात प्रमाणभाषा नसून त्याच्या तोंडची बोलीभाषा असते. दलित साहित्यात ग्रामीण बोली भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात दिसून येतो. दलितेतरांनी लिहिलेल्या दलित कादंबरीतून प्रमाणभाषा व बोली भाषा किंवा ग्रामीण भाषा यांचा वापर केल्याचे दिसून येते. परंतु दलित लेखकांनी लिहिलेल्या दलित कादंबरीचा निवेदक हा स्वत: नायक असल्याने तो आपल्या तोंडची सहवासाची भाषा वापरताना दिसतो. दलित लेखकाच्या लेखनात तो जे जीवन जगतो, भोगतो त्याचे वास्तवचित्रण उतरत असते. रणजित देसाई यांनी लिहिलेल्या 'समिधा' या कादंबरीचा काही निवडक दलित कादंबऱ्यांच्या अनुषंगाने अभ्यास करावयाचा आहे. त्यापैकी 'समिधा' मधील भाषा व इतर निवडक कादंबऱ्यातील भाषा याचा सविस्तर विचार करावयाचा आहे.

'हाडकी-हाडवळा' या कादंबरीत ढसाळांनी ग्रामीण बोली भाषेचा वापर केला आहे. लेखकाने श्लील-अश्लील, सभ्य-असभ्य, योग्य-अयोग्य कोणत्याही प्रकारचे बंधन न पाळता अगदी कणखरपणे पात्राच्या तोंडून शिव्या वक्तविल्या आहेत. जवळजवळ पंच्चाहत्तर शिव्यांचा वापर लेखकाने केला आहे. त्यामुळे या कादंबरीतील भाषेत स्वाभाविकता दिसून येते. या शिव्यांच्या आधारावर दलित समाजाचे मान-मूल्य, नीतीबोध, सामाजिक दर्जा व संस्कृतीदर्शन लेखकाने घडविले आहे. शिव्या, लोकोक्ती, म्हणी, वाक्प्रचार व सुभाषितवजा वाक्यांचा उपयोग हाडकी-हाडवळा मध्ये लेखकाने केला आहे. ही कादंबरी भाषेच्या बाबतीत पाहिले तर प्रादेशिक वैशिष्ट्याचा एक नमुना असल्याचे दिसून येते. 'हाडकी-हाडवळा'मध्ये सातारा भागातील ग्रामीण बोलीभाषा येते. गावात जेव्हा रगतपिती भरलेला माणूस मरण पातवो तेव्हा गावातील लोक दलितांना त्याचे प्रेत उचलायला सांगतात. तेव्हा बायजा त्यांचा हा डाव लक्षात घेऊन त्यांना म्हणते, ''पाटील मंडळी मी ना तुमच्या जातीची, गोतीची, आमच्या नुसत्या सावलीन तुमाला बाट व्हतो. असे आसूनबी तुमी त्याला उचलोत न्हाय. म्हंजी ह्योतर जुलूमच झाला. मी सत्याबाबाला उचलून नेते पर.... या फुड कुणीबी मरो तुमचे आई-बाप, भाऊ-बहिण, बायका-मुलं पर मीच बहाद्दरीन त्यांची करमक्रीया करीन असं तुमी समद्यांनी मला लिहून द्या हाय का मंजुर तुमाला तोडगा ?''[२६] बायजाच्या या संवादातून एक हुशारीपणा दिसून येतो. त्यांची बोटे त्यांच्याच डोळ्यात घालणे हा प्रकार इथे दिसून येतो. तसेच तिच्या भाषेतून अस्सल ग्रामीण भाषेचा प्रत्यय येतो.

नामदेव ढसाळ लोकांच्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी लोकभाषेतील म्हणींचा वापर करताना दिसतात. ''कुंकवाशिवाय भांगाला आन् नवऱ्याशिवाय भानवशीला शोभा न्हाय.'' (पृ.क्र. ५१)

'नव्या तरण्याबांड, आन् काळ्या कुत्र्याचा आंड !' (पृ.क्र. ३५),

'विहिरीतच नाही तर पोहोऱ्यात कुढून येणार' (पृ.क्र.१७)

'जिथं फुलं उधळली, तिथं गवऱ्या वेचायची पाळी झालीय.' (पृ.क्र.१६)

या म्हणींच्या वापरामुळे कथानकातील आशयाचे सौंदर्य खुलताना दिसते. कादंबरीत महार समाजाने 'मेलेल्या जनावराचे वाटे घालतानाचे चित्रण येते. त्यामुळे काळीज, बोका, गुडसं, ह्याळ, फीपीस, खुर अशा जनावरांच्या शरीराची नावे आलेली आहेत. यावरून 'हाडकी हाडवळा'तील भाषेचे दर्शन पडते.

'७२ मैल' कादंबरीत लेखकाने ग्रामीण भाषेचा वापर केला आहे. ही भाषा लेखक व राधाक्का तसेच तिच्या अर्धा डझन पोरांच्या तोंडची आहे. या कादंबरीत राधाक्काच्या तोंडची भाषा ही अस्सल दलित चित्रण करताना दिसते. तिच्या तोंडची भाषा ही परिणामकारक वाटते. ''शांतपणानं वागावं, सुदीन न्हावावं ! चो लोकांचं आयकावं ! हाट करूनी.... म्होर आल्यालं मोजून खावावं, येवारानं चालावं, जलमाचा समंद, हुता तवा माज्या पोरांच्या मार्तिकास्नी तुजा हात लागला.....''

डाव्या अंगानं जा.... बाबा डाव्या अंगान जावावं. रस्त्याच्या... तू आपला रस्ता सोडून शान कडकडनच जा.... आसुक्क्या ह्या रस्त्यावरची डायवरखाली हाल्क्ट लयी ! त्वा बघटल्यास समंद... त्येंच्या डोक्यावर मांदे आस्तया. मेढरू चिरडल्यावानी चिरडून जातीली तुला.... आन तु आपला पडशील बेवारशागत. माज्या रानूवानी... ह्या रस्ता आपला न्हायीच आस म्हन जा मनाला, आन

जा....''[२७] या संवादावरून असे दिसून येते की, राधाक्का ही अशिक्षित असली तरी लेखकाला व्यवहारज्ञान सांगते यावरून तिचा हुशारीपणा दिसून येते. ती लेखकाला जीवन कसे जगावे याचे धडे देताना दिसते. राधाक्काच्या मुलाच्यामधील भांडणातून अगदी अस्सल ग्रामीण शिव्यांचे दर्शन घडते. तसेच म्हणींचाही वापर या कादंबरीत केलेला दिसून येतो. 'म्होर आल्याल आन भंजून खावावं' (पृ.क्र.४), 'डोळ्याव मांद आस्त' यासारखी ग्रामीण वाक्ये आपणास या कादंबरीतून पहावयास मिळतात. अशा प्रकारची भाषाशैली वापरून लेखकाने घटनाप्रसंगांची निर्मिती अगदी परिणामकारक केल्याचे दिसून येते. या कादंबरीमध्ये कोल्हापूरच्या उत्तरेला सांगली जिल्ह्याच्या सीमेवर बोलल्या जाणाऱ्या भाषेचा योग्य वापर संवादासाठी केलेला दिसतो. कोल्हापूर भागातील लोकांचा राग, प्रेम, आनंद या गोष्टीतही शिव्या दिसून येतात. ते सहज बोलतानाही शिव्यांचा वापर करताना दिसतात. यावरून लेखकाने वापरातील भाषेचा वापर करून कादंबरीला एक वेगळे वळण दिल्याचे दिसून येते.

'जातीला जात वैरी' या कादंबरीत लेखकाने महार, मांग, चांभार व ढोर समाजातील दलितांचे जीवन चित्रित केले आहे. यामध्ये सवर्ण दलितांसोबत अरेरावीच्या व हुकूमशाहीच्या भाषेत बोलतात. तर दलितांमध्ये श्रेष्ठ असणारी जात कनिष्ठ जातीशी बोलते हे लेखकाने त्यांच्या बोली भाषेचा योग्य तो वापर करून दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. जेव्हा महार हा गावातले एखादे मेलेले जनावर गावाबाहेर घेऊन जाऊन फाडायचा आणि त्याचे काढलेले कातडे काढून ढोराकडे घेऊन जायचा म्हणजेच ढोराला जो हार घालायचा त्यावेळी त्याच्या तोंडी आलेली भाषा लेखकाने चित्रित केली आहे.

''काय रं, काय आणलस ?'' ढोर विचारायचा

"जी कातड आणलयाची" म्हणत महार अंगणातल्या एखाद्या कोपऱ्यात कातडं ठेवून दूर उभा रहायचा.

'किती पाहिजेत ?' ढोर
"द्या देवा ! आपल काहीतरी समजून महार."[२८]

या संवादातून ढोर समाजातील माणसे महार समाजाला कनिष्ठ समजताना दिसतात. ढोर हा उद्दटपणे तर महार हा शांत, नरमपणे आणि आदरार्थी बोलताना दिसतो. कमविलेले कातडे चांभारांना विकताना ढोर अशीच भाषा वापरताना दिसतो. शाळेतील मुले बे, अबे या शब्दांचा वापर करताना दिसतात. "खा बे साखर काय माझी नाही" (पृ.क्र.२), "तुम्ही दहा नंबर खाता" (पृ.क्र.३), अबे तुमच्या जातीचा माणूस गिरणीत राखणदार आहे. (पृ.४५), "जावा बे तुमच्या बाबासाहेबान आमच्यासाठी काही केलं नाही. (पृ.४५), 'कोण आहे बे जरा समोर येऊन बोल.' (पृ.७३), या वाक्यावरून त्याचा प्रत्यय येतो.

'कार्यकर्ता' कादंबरीतून ग्रामीण तसेच प्रमाणभाषेचा वापरही होताना दिसतो. दलितांच्या तोंडची भाषा ही ग्रामीण व गावंडळ आहे. तर कादंबरीचा निवेदक सदाच्या तोंडची भाषा ही प्रमाणभाषा आहे. पांडूला जेव्हा साप चावतो व तो मरतो तेव्हा त्याच्या आईशी जो संवाद होतो तेव्हाचे चित्रण अस्सल ग्रामीण दलित होताना दिसते.

'मी माझ्या गावाच्या शोधात' या कादंबरीतून आलेली भाषा ही दलितांच्या तोंडची भाषा आहे. तर निवेदकाच्या तोंडची भाषा ही अरेरावीची व हुकूमशाहीची आहे. तर दलित स्त्रियांच्या तोंडची भाषा ही गावंडळ व ग्रामीण भाषा आहे. त्या जेव्हा सवर्णांशी भांडतात तेव्हा शिव्या देऊन त्यांचा उद्धार करताना दिसतात.

कादंबरीतील राधाबाय जेव्हा लाकडं आणायला पांदीला जाते तेव्हा तिला अपशब्द वापरून धमकावण्याचा प्रयत्न केला जातो. तेव्हा ती म्हणते की, ''आरं ये भाडखाऊ ! ये माझ्या म्होरं !... लाव माझ्या आब्रूला हात, तुजा ह्या इळ्यानं जीवच घेती. तुला फाडतीच''[२९] यावरून या कादंबरीतील भाषा आपल्या लक्षात येते.

'कुस्ती' कादंबरीतील भाषा ही ग्रामीण भाषा आहे. भाषेमध्ये कुठेही स्फोटकपणा जाणवत नाही. चांदणी गावातील पात्रांच्या तोंडी ग्रामीण बोलीभाषेचा वापर दिसून योते. तर मिनाक्षी, संपा. डमढेरे, प्रा. राजमाने व प्रकाश हे बीडमध्ये राहत असलेने त्यांच्या तोंडी नागर भाषेचा वापर होताना दिसून येते. प्रा. राजमाने यांच्या भाषेतून कनवाळूपणा तर संपा. डमढेरे यांच्या भाषेतून फसवेपणा दिसून येतो. शिवा, रमा, प्रकाशचे आई-वडील, रमाचे आई-वडील, नारायण, वसंता, सुभानराव सरपंच व कचरू पाटील यांच्या तोंडी ग्रामीण भाषा दिसून येते. मांजरा नदीच्या काठावर असणाऱ्या चांदणी गावाची भाषा ही अस्सल ग्रामीण घाबरटपणाची व लाचारीपणाची दिसून येते. लईच आकडणे, काळीज कापून ठेवणे, पीडा घालवणे, चव चाखणे, बाट पाळणे, बरासी खंदणे, काडी करणे, पोतखिळी ओळखणे, पोटात आग पडणे त्यासारखे वाक्प्रचार या कादंबरीतून दिसून येतात. भाडखाऊ, मेले, आयला, दहाष सारखे शब्द तसेच 'त्यो पास झालाय कवा ! मग आंदा बी व्हईन पास. जळू परत ते सिक्स्यान लेकराच तोंड बघाया भेटत नाही स्सा स्सा महीण' (पृ.११), 'आकडु झवण हाय तिच्या मायला' (पृ.१३), यासारखी शिवराळ भाषेतील वाक्ये या कादंबरीतून दिसून येतात. यावरून कुस्तीमधील भाषेचा प्रत्यय येतो.

'बहिष्कृत' मधूनही ग्रामीण भाषेचा वापर होताना दिसतो. परंतु प्रदेशानुसार बोलण्याची लकब त्यांच्या भाषेतून दिसून येते. त्या प्रदेशात बोलली जाणारी भाषा, वाक्प्रचार, म्हणी व शिव्या यांचा योग्य पद्धतीने वापर केला तरच त्या भाषेतून प्रादेशिक भाषेची वैशिष्ट्ये दिसून येतात. रघोजी देशमुखाच्या भाषेतून त्याची हुकुमशाहीची व अधिकाराची भाषा दिसून येते.

'तणकट' कादंबरीतील भाषा ही गडहिंग्लज-गारगोटी परिसरातील भाषा असल्याचे दिसून येते. या भाषेतून त्यांची प्रादेशिकता दिसून येते. लेखक 'व्यक्तीच्या मनातील राग, क्रोध व्यक्त करण्यासाठी शिव्यांचा वापर करताना दिसतो. "बोंबलू दे घे, रांडा-भाडे ! आमचा खंग भाजाचा निघालती त्येंचाच भाजला. रांडा-भाड्यास्नी भोगाय आलं. थळोबानं बघून घेतलं. अजहून भोगाय ईल लईलई. माझी तळतळ लागली भाड्यास्नी. नाष्टावा व्हईल एकेकाचा, आमाला म्हारकीतन बाहीर घालविणार व्हती न्हवंऽऽ आता बस म्हणावं बोंबलत. रांडांनी हातरुणं घातल्यात म्हण ऽऽ हुडहुडी भरलीया. परत्येकीच्या दारात जाऊन आलो. जराशी ध्याई शान्त झाली बघ."[३०] या कबीरच्या आईच्या तोंडच्या भाषेतून तेथील प्रादेशिक भाषा किती गावंडळ व शिवराळ आहे याचा प्रत्यय येतो. कादंबरीत बारकी-सारकी, हिसका-हिसकी, लुटूलुटू, कसला-बसला असे जोडशब्द दिसून येतात. तसेच नामोनिशान, बेस्तरवारी, धन्तुरा, हायवानासकट, खारकांड, ल्हास, इदरनी, गोठणावर, दातलायला असे बरेच शब्दप्रयोग पहायला मिळतात. यावरून 'बहिष्कृत'मधील भाषेचा प्रत्यय येतो.

'भाकरी आणि फूल' या कादंबरीत लेखकाने करूळ घाटाच्या पायथ्याला बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेचा चांगला वापर केला आहे. भाषेच्या

आशयकारक रचनेमुळे कादंबरीतील महार समाजाचे दु:ख, लाचारी, सवर्णांचा मग्रुरीपणा याचे चांगले चित्रण लेखकाने केलेले दिसून येते. गोपाळ व पांडुरंग यांच्याकडे आलेले शिवनाक व मोन्या हे मुंबईत आल्यावर गावकऱ्यांची घरे फिरतात व त्यांनी दिलेली मिठाई, पैसे व कपडे गोळा करतात. हे गोपाळ, नलिनी व पांडुला आवडत नाही. तेव्हा शिवनाक गोपाळशी बोलताना जी भाषा वापरतो त्या भाषेतून त्याच्या परिस्थितीची जाणीव होते. त्यांच्या या कोकणी भाषेच्या वापरामुळे आशय अगदीच परिणामकारक दिसून येतो. कादंबरीतील सवर्ण दलितांना गलिच्छ शिव्या देताना दिसतात. गोपाळच्या गडेमठच्या बहिणीवर झालेल्या अत्याचाराचे चित्रण करताना वापरलेली भाषा अगदी परिणामकारक वाटते. तसेच गोपाळ या गोष्टीवर काही करू शकत नाही. त्यावेळी त्याच्या तोंडी आलेली दुबळेपणाची, लाचारीची भाषा या कादंबरीतून चित्रित होते.

'समिधा' कादंबरीतील भाषेविषयी सविस्तर विवेचन या लघुप्रबंधिकेच्या दुसऱ्या प्रकरणात केले आहे. त्यामुळे इथे थोडक्यात भांडणे योग्य वाटते. 'समिधा' कादंबरीतील भाषा ही निवेदनाची व ग्रामीण वातावरण चित्रित करणारी आहे. लेखकाने म्हणी, वाक्प्रचार, चटकदार संवाद, व्यक्ती आणि प्रसंगानुरूप शब्दयोजना यांचा वापर करून उठावदार भाषेची निर्मिती केली आहे. चूक पोटात घालणे, तोंडाला पाणी सुटणे असे काही वाक्प्रचार, राजानं मारल अन् पावसान झोडपल तर सांगायच कुणाला ? 'रेडा सोडू नये पाण्यात आणि महार सोडू नये महारवाड्यात', 'सशाला खळगा जामीन', 'स्टीच इन टाईम, सेव्हज द नाईन' अशा काही मराठी, इंग्रजी म्हणींचा वापर 'समिधा'मध्ये दिसून येतो. देवाच्या तोंडची भाषा ही लाचारीपणाची व दुबळेपणाची भाषा आहे. तर तुकाच्या भाषेतून त्याचा बेडरपणा

दिसून येतो. सवर्णांच्या तोंडची भाषा ही अरेरावी व मग्रुरीपणाची भाषा असल्याचे दिसून येते. तसेच 'एखादा विंचू डसावा तसा भगवंतराव मागे सरकला', 'आता जमीनी तव्यावरच्या भाकरीगत फुलतील' यासारखी अलंकारिक वाक्ये वापरून देसाईनी कादंबरीतील या भाषेला सौंदर्य आणण्याचा प्रयत्न केला आहे.

'समिधा' आणि इतर काही निवडक कादंबऱ्यातील भाषेविषयी अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, बऱ्याच कादंबऱ्यांमधून दलित-सवर्ण असे दोन स्तर असल्यामुळे दलितांच्या भाषेतून लाचारीपणा व दुबळेपणा दिसून येतो तर सवर्णांच्या भाषेतून त्याची हुकूमशाही दिसून येते. इतर कादंबऱ्यांच्या तुलनेत भाषेच्या बाबतीत 'समिधा'चे स्थान लक्षणीय ठरते. दलित-सवर्ण संघर्षाचे चित्रण करताना वापरलेली भाषा ही अगदीच परिणामकारक वाटते.

**निवेदन :**

कादंबरीचे कथानक वाचकाला कोणाकडून तरी सांगितले जाते. या क्रियेला निवेदन म्हणतात. कादंबरीचा आशय परिणामकारक होण्यासाठी निवेदन तसे ठासीव पद्धतीचे असावे लागते. लेखक एखाद्या पात्राच्या तोंडून निवेदन घालतो तेव्हा त्याला प्रथमपुरूषी निवेदन तर जेव्हा कादंबरीत कोणतीही व्यक्ती निवेदन करीत नाही या क्रियेला यामध्ये प्रत्यक्ष निवेदक नसून तो अदृश्य असतो. कथाविश्वात न राहता तो बाहेरून निवेदन करीत असतो. म्हणून त्याला सर्वसाक्षी निवेदन असे म्हणतात. कादंबरीच्या आशयानुसार लेखक निवेदन पद्धतीचा वापर करीत असतो.

प्रस्तुत प्रकरणात 'समिधा' या कादंबरीतील निवेदनाचा इतर काही निवडक दलित कादंबरीतील निवेदनाच्या अनुषंगाने विचार करावयाचा आहे.

'हाडकी हाडवळा' कादंबरीत लेखकाने तृतीय पुरूषी निवेदनातील ग्रामीण भाषेतील शब्दांचा चांगला वापर केलेला दिसून येतो. ''अखेर भळभळत राहणाऱ्या पावसाचं प्रपातात रूपांतर झालं. दिवसावर दिवस रेटू लागले, पण पाऊस काही खळेना. काळ्याभोर ढगांनी आकाश गच्च कोंदटून आलेलं, औषधालाही वाफसा होईना. नखाला दाखवायलाही सूर्य दिसेने. सर्वत्र प्राण घुसमटून टाकणारा ओलाजर्द, सादळलेला किर्र काळोख, मुसळाएवढ्या धारांनी जमिनीच्या पोटात दडलेला खडान् खडा उघडा पडू लागला.''[३१] यावरून 'हाडकी हाडवळा'तील निवेदन पद्धतीचा प्रत्यय येतो.

'जातीला जात वैरी' या कादंबरीतील निवेदक निनावी आहे. या कादंबरीतील निवेदक हा दलित समाजात जाती-जमातीमध्ये असलेली श्रेष्ठ-कनिष्ठता, ताणतणाव आणि त्यांच्या संबंधाबाबत नि:पक्षपातीपणे वागताना दिसतो.

'७२ मैल' कादंबरीत प्रमाणभाषेत निवेदन केल्याचे दिसून येते. सातारा-कोल्हापूर प्रवास करत असताना निवेदक, राधाक्का आणि तिच्या सहा पोरांना ज्या परिस्थिततून जावे लागले याचे निवेदन लेखकाने अगदी परिणामकारकपणे टिपले आहे. जेव्हा राधाक्का व तिच्या सहा पोरांची भेट होते तेव्हाच त्यांच्या कपड्यालत्यांचे व चेहऱ्यावरच्या भाव-भावनांचे वर्णन लेखकाने उत्तमरित्या केलेले दिसून येते. निवेदकाला त्यावेळी कचरा खाऊन दिवस काढावे लागलेले असतात. त्या कचऱ्याला मोल जे आज आहे ते आजच्या पक्वानांना नाही. आज निवेदक चांगले जीवन जगत आहे. निवेदकाची ही भावना अतिशय प्रभावीपणे प्रकट होताना दिसते.

'कार्यकर्ता' कादंबरीतील निवेदन हे प्रथमपुरूषी निवेदन येते. निवेदकाचे त्याच्या जीवनात घडलेल्या घटना-प्रसंगांचे क्रमवार संकलन असल्याने लेखक प्रमाणभाषेत निवेदन करताना दिसतो. परंतु या कादंबरीतील दलितांच्या तोंडी मात्र ग्रामीण भाषा दिसून येते.

'मी माझ्या गावाच्या शोधात' या कादंबरीत लेखकाने प्रथमपुरूषी निवेदन पद्धतीचा वापर केला आहे. लेखक आपल्या घराचे वर्णन करतानाचे निवेदन फारच लक्षणीच वाटते. तो आपल्या घराला घर म्हणण्याऐवजी खोपाटच म्हणतो. लेखकाने गावाने बहिष्कार टाकल्याने वाट फुटेल तिकडे पळणाऱ्या आपल्या गावाचा शोध कसा घेतला व घेताना आलेले अनुभव याचे निवेदन केले आहे.

'कुस्ती' कादंबरीत तृतीय पुरूषी निवेदन आले आहे. शिवावर जेव्हा हल्ला झाला त्या रात्री कचरू पाटलांच्या वाड्याचे वर्णन हे अतिशय थरारक असे वाटते. ''कचरू पाटलाच्या जुनाट वाड्याला अंधाऱ्या रात्रीने भयान स्वरूप आले होते. रातकिड्यांची किर्‌किर्‌ आणि भयान शांतता पाहून त्या ठिकाणी कोणी माणूस राहत असेल यावर विश्वास बसायचा नाही असे वातावरण होते. झोपेतच कूस बदलून शिवा थोडासा पुन्हा गाढ झोपी गेला.''[३२] यावरून लेखकाने उत्कृष्ट निवेदनाची भाषा वापरून आशय परिणामकारक चित्रित केल्याचे दिसून येते.

'बहिष्कृत' कादंबरीत तृतीयपुरूषी निवेदन आले आहे. सुकड्या महाराजाच्या घरातील एका खोलीच्या सजावटीचे चित्रण करताना निवेदक निवेदन करतो की, ''त्या खोलीच्या चुना चोपडलेल्या कुडाच्या भिंतीवर एका बाजूला देवादिकांच्या, गौतमबुद्धाच्या आणि डॉ. आंबेडकरांच्या असंख्य तसबिरी होत्या. तर दुसऱ्या बाजूला कॅलेंडरवरून, मासिकातून जुन्या वर्तमानपत्रामधून कापून

काढलेल्या नटनट्यांच्या छब्या चिकटवल्या होत्या.''[३३] एका बाजूला दलित समाज महामानवांच्या विचाराने चालतो, त्यांचे फोटो तर दुसरीकडे नटनट्यांचे फोटो असा विरोधाभास साधून लेखकाने परिणामकारकरित्या निवेदन केल्याचे दिसते.

'तणकट' कादंबरीत प्रमाणभाषेत निवेदन केल्याचे दिसून येते. परंतु कलवंडून, काळ्या ठिक्कर, दाबजारे, इदरनी, इराद्यान, किरपया, शाबूत, चिलट, किनीर, कार्टी, बूड असे ग्रामीण बोलीतील शब्द पहावयास मिळतात. राजन गवस निवेदनातून अगदी बारीक-सारीक तपशीलदेखील सुटू देत नाहीत.

'भाकरी आणि फूल' कादंबरीतील लेखकाने तृतीयपुरूषी निवेदनाचा वापर केला आहे. या कादंबरीत निवेदकाने दलित वस्तीतील घरादाराचे वर्णन केले आहे. आब्रु खोताचा कुत्रा रामेश्वराच्या ढुंगणाला पाठ लावून झोपलेला पाहून पांडुरंग म्हणतो, ''साला कुत्रा.... एक जनावर त्याला थेट गाभाऱ्याच्या घरातल्या नंदीपर्यंत जायला मिळते नि आम्हा म्हारांच्या पोरांनी महारवाड्याच्या पुढे जायचे नाही... वा रे वा.''[३४] या निवेदनातून लेखकाने सवर्णांकडून दलितांना मिळणारी अस्पृश्यतेची वागणूक दाखवून दिली आहे.

'समिधा' कादंबरीतून लेखक तृतीय पुरूषी निवेदनाचा वापर करतो. सवर्णांनी जाळलेल्या दलित वस्तीचे वर्णन करताना लेखक म्हणतो, ''वळवाच्या पावसात फेसाळत ओढा यावा तसा माणसांचा पूर हरिजनवाड्यात घुसला, मशाली घेतलेला तो जमाव पाहताच तुका आपल्या साथीदारांसह मागे हटला. दोन्ही बाजूंनी दगडांचा वर्षाव सुरू झाला. घरांच्या छपरावर रॉकेलच्या बाटल्या फुटत होत्या. पाठोपाठ जळते बोळे फरफटत पडू लागले. झोपड्या पेटू लागल्या भीतीनं घरात बसलेल्या बाया घराला आग लागताच जीवं भीतीनं बोंबलत घराबाहेर आल्या

..........................जमाव तक्क्याजवळ आला तेव्हा क्षणभर त्यांची गती थांबली.''[३५] अशा पद्धतीचे निवेदन करून लेखकाने आशयाला परिणामकारकता आणण्याचा प्रयत्न केला आहे. एकिकडे महारवाडा तर दुसरीकडे देशमुखाचा वाडा असा विरोधाभास दाखवून लेखकाने वातावरणनिर्मिती केली आहे.

**समारोप :**

प्रस्तुत प्रकरणात 'समिधा' या कादंबरीचा काही निवडक कादंबऱ्यांच्या अनुषंगाने अभ्यास केला. तो करत असताना कादंबरीच्या घटकांच्या अनुषंगाने केला. यावरून 'समिधा' या कादंबरीची गुणवत्ता पाहिली. 'हाडकी-हाडवळा', '७२ मैल', 'जातीला जात वैरी', 'कार्यकर्ता' व 'मी माझ्या गावाच्या शोधात' या दलित तर 'कुस्ती', 'बहिष्कृत', 'तणकट' आणि 'भाकरी आणि फूल' या दलितेतर लेखकांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने 'समिधा' या कादंबरीचे स्थान निश्चित केले. या सर्व कादंबऱ्यांचे कथानक अभ्यासले तेव्हा असे दिसून आले की, सर्व कादंबऱ्यांमधून दलित व सवर्ण हे स्तर दिसून येतात. तसेच त्यांच्यात होणारे ताण-तणाव, अस्पृश्यता, अन्याय-अत्याचार या सर्वांचे दर्शन घडते. त्याच पद्धतीचेकथानक 'समिधा' कादंबरीचेआहे. 'भाकरी आणि फूल' मधून कर्णिकांनी जे दलित जीवन चित्रित केले आहे ते अगदीच परिणामकारक वाटते. त्यामध्ये रणजित देसाई हे देखील कुठे कमी पडल्याचे दिसत नाहीत. त्यांनी तुकाच्या माध्यमातून एका भावी दलित तरूणाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या तरूणाचे चित्रण केले आहे. दलित कादंबऱ्यांच्या कथानकाबाबत गो.म. कुलकर्णी म्हणतात की, ''कथानकातील मांडणीचे कच्चेपण, साचेबंद, स्वभावचित्रण, वृत्तपत्रीय स्वरूपाचे निवेदन भडक घटनांचे प्राबल्य, येनकेन प्रकाराने प्रणयप्रसंग घुसडण्याची हौस, यासारखे आजच्या ग्रामीण बोलपटात शोभणारे घटक या कादंबऱ्यातून आढळतात.''[३६]

व्यक्तिचित्रणाच्या बाबतीतही ‘तणकट’, ‘बहिष्कृत’, ‘भाकरी आणि फूल’ आणि ‘समिधा’ या कादंबऱ्यातून लेखकाने नायकांच्या माध्यमातून दलित नव्या तरूणपिढीचे चित्रण रेखाटले आहे. समिधा आणि इतर कादंबऱ्यातून आलेल्या व्यक्तिरेखा पाहिल्या तर त्यांच्यात बराच साम्यपणा दिसून येतो. रणजित देसाई यांनी ‘समिधा’मध्ये जो नायक चित्रित केला आहे. तो आक्रमक भूमिका घेताना कमी पडताना दिसून येतो. तसेच या नायकाने सवर्णांसमोर हार मानलेली दिसून येते.

भाषाशैलीच्या दृष्टीने विचार केला तर सर्वच कादंबरीतील भाषा ग्रामीण असलेली दिसून येते. ‘भाकरी आणि फूल’ या कादंबरीत प्रादेशिक भाषेचा वापर केलेला दिसून येतो. त्याचपद्धतीची ‘समिधा’ मधील भाषा ही अस्सल ग्रामीण जीवन चित्रित करणारी आहे.

निवेदनाच्या बाबतीत ‘हाडकी हाडवळा’, ‘बहिष्कृत’, ‘कुस्ती’, ‘भाकरी आणि फूल’, ‘कार्यकर्ता’ आणि ‘समिधा’ या कादंबऱ्यातून तृतीयपुरूषी निवेदन केलेले दिसून येते. ‘जातीला जात वैरी’ या कादंबरीतील निवेदक निनावी आहे. सर्वच कादंबऱ्यातून तृतीयपुरूषी निवेदन केलेले दिसून येते. ‘जातीला जात वैरी’ या कादंबरीतील निवेदक निनावी आहे. सर्वच कादंबऱ्यातून ग्रामीण भाषेतील निवेदन आलेले दिसून येते. ‘मी माझ्या गावाच्या शोधात’ या कादंबरीत व ‘७२ मैल’ या कादंबऱ्यातून प्रथम पुरूषी निवेदन आल्याचे दिसते. ‘भाकरी आणि फूल’, ‘तणकट’, ‘बहिष्कृत’ व ‘समिधा’ या कादंबऱ्यांचे निवेदन पाहिले तर त्या वास्तव वाटल्याखेरीज राहत नाही.

एकूणच वरील निवडक कादंबऱ्यांच्या अनुषंगाने विचार केला तर ‘रणजित देसाई’ यांची ‘समिधा’ ही कादंबरी लक्षणीय ठरते.

-----

# प्रकरण तिसरे

## संदर्भ ग्रंथ


१) गंगावणे, कमलाकर : 'अस्मितादर्श', जाफेमा, १९८४, संपादक - गंगाधर पानतावणे, पृ.क्र.४८.

२) व्हटकर, अशोक : '७२ मैल', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ.क्र.६.

३) ढगे, सुशीला : 'मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल', सुगावा प्रकाशन, पुणे, २००४, पृ.क्र.१५१.

४) भगत, दत्ता : 'प्रतिष्ठान', ऑक्टोबर-नोव्हेंबर, १९७९, पृ.क्र.४३.

५) तत्रैव : पृ.क्र.४४.

६) ढसाळ, नामदेव : 'हाडकी हाडवळा', रविराज प्रकाशन, पुणे, १९८१, पृ.क्र.१२०.

७) तत्रैव : पृ.क्र.६६.

८) गंगावणे, कमलाकर : उनि., पृ.क्र.४९.

९) व्हटकर, अशोक : उनि., पृ.क्र.११२.

१०) तत्रैव : पृ.क्र.११.

११) जाधव, मुरलीधर : 'कार्यकर्ता', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९८४, पृ.क्र.१११.

१२) खरात, शंकरराव : 'मी माझ्या गावाच्या शोधात', प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८३, पृ.क्र.९५.

१३) तत्रैव : पृ.क्र.९६.

१४) सिरसट, विजय : ‘कुस्ती’, रिमझिम प्रकाशन, औरंगाबाद, १९८२, पृ.क्र.१२५.

१५) तत्रैव : पृ.क्र.६४.

१६) तत्रैव : पृ.क्र.९.

१७) मंचरकर, र.बा. : ‘वाङ्मयाचे महाविद्यालयीन अध्यापन’, गुरूवर्य डॉ. दु.का. संत गौरवग्रंथ, सौरभ प्रकाशन व वितरण, कोल्हापूर, १९८७, पृ.क्र.४०४.

१८) भगत, दत्ता : ‘प्रतिष्ठान’, पृ.क्र.४५, ४६.

१९) गवस, राजन : ‘तणकट’, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८, पृ.क्र.१०३.

२०) तत्रैव : पृ.क्र.८.

२१) कर्णिक, मधु मंगेश : ‘भाकरी आणि फूल’, मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई, १९८२, पृ.क्र.२५.

२२) तत्रैव : पृ.क्र.११.

२३) ठाकूर, रवींद्र : ‘मराठी ग्रामीण कादंबरी’, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, २००१, पृ.क्र.१४२.

२४) कर्णिक, मधु मंगेश : उनि., पृ.क्र.२३.

२५) देसाई, रणजित : ‘समिधा’, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, १९८१, पृ.क्र.३३.

२६) तत्रैव : पृ.क्र.८०.

२७) ढसाळ, नामदेव : उनि., पृ.क्र.४१, ४२.

२८) व्हटकर, अशोक : उनि., पृ.क्र.११९.

२९) शिंदे, ना.म. : ‘जातीला जात वैरी’, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,

१९९१, पृ.क्र.७.

३०) खरात, शंकरराव : उनि., पृ.क्र.८०.

३१) गवस, राजन : उनि., पृ.क्र.२२६.

३२) ढसाळ, नामदेव : उनि., पृ.क्र.५.

३३) सिरसट, विजय : उनि., पृ.क्र.९७.

३४) साधू, अरूण : 'बहिष्कृत', मॅजेस्टीक बुक स्टॉल, मुंबई, पहिली आवृत्ती, १९७८, पृ.क्र.४३.

३५) कर्णिक, मधु मंगेश : उनि., पृ.क्र.८.

३६) देसाई, रणजित : उनि., पृ.क्र.११४, ११५.

३७) कुलकर्णी, गो.म. : 'आजचे मराठी दलित साहित्य', महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ऑक्टो.-डिसें., १९८७, पृ.क्र.९.

-----